


# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, सोमवार दि. ३१.०८.२०२६ | अंक नं. १२९ | वर्ष ६९ वे | दैनिक वर्ष ६३ वे | ANR/022/2018-2020



SONI TILES Since 1965
AND MARBLE INDUSTRIES
Opp. Munot Estate, Station Road, Ahmednagar. Tel. : (0241) 2418720
Mob. 9372497999
Wholesalers & Manufacturers of - Ceramic Wall & Floor Tiles, Vitrified Tiles, Paving Blocks, Marble & Granite
सोनी टाईल्स अ‍ॅण्ड मार्बल इंडस्ट्रिज

तुमच्या बॉर्न बेबीची काळजी तुमच्याप्रमाणे आम्हालाही
नवजात बाळासाठी सर्व काही इथेच...
आता पुण्यात सुद्धा..
। स्वेटर । जॅकेट । झबले । टोपी । लंगोट । गादी ।
। मच्छरदाणी । वडी । कॅप । टॉवेल । दुपट ।
। प्लास्टीक ड्रायशिट । सॉक्स । हातमोजे व बरेच काही.
जरीवाला
कापड बाजार, नं. 7666510765
यशोदानगर, पाईपलाईन रोड, अ.नगर
सिंहगड रोड, त्रिमुर्ती हॉस्पिटल जवळ, योगेश मेडीकल शेजारी, पुणे. मो. 7775089505

चलो दुबई
खरेदी सोन्याची, होईल भाग्याची..
सोने-चांदीच्या खरेदीवर स्क्रॅचकार्डव्दारे
जिंका दुबई ट्रिप
किंवा आकर्षक गिफ्ट बॉक्स
₹ 50000/- सोने खरेदीवर
₹ 20000/- चांदी खरेदीवर
₹ 5000/- भिशी योजनेत सहभागी व्हा.
₹ 5000/- फॉर्मिंग ज्वेलरीच्या खरेदीवर
स्क्रॅचकार्डव्दारे जिंका दुबई ट्रिप
किंवा आकर्षक गिफ्ट बॉक्स व सोबतच
मजुरीही सर्वात कमी.
22 कॅरेट सोन्याचा
सर्वात कमी भाव, सर्वात कमी मजुरी..
₹ 999/-*
दागिन्यांची प्रतीग्रॅम मजुरी
चंदुकाका ज्वेल्स
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड,
सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02
बुधवार चालु


## महाराष्ट्रामध्ये पुन्हा पावसाचा जोर वाढणार

पुणे – ऑगस्ट महिन्यात अपेक्षेप्रमाणे पाऊस न झाल्याने राज्यातील अनेक भागांत पावसाची तूट कायम आहे. मात्र, सप्टेंबरच्या सुरुवातीला हवामानात पुन्हा बदल होण्याची शक्यता असून, राज्यातील काही भागांत मुसळधार तर काही ठिकाणी मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याचा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे. बंगालच्या उपसागरात तयार झालेल्या कमी दाबाच्या क्षेत्रामुळे पावसासाठी अनुकूल स्थिती निर्माण झाली आहे.

हवामान विभागाच्या अंदाजानुसार, ३ ते १० सप्टेंबरदरम्यान कोकणातील बहुतांश जिल्हे, मध्य महाराष्ट्रातील काही भाग आणि विदर्भातील काही जिल्ह्यांत पावसाचा जोर वाढू शकतो. विदर्भातील गडचिरोली आणि गोंदिया जिल्ह्यांमध्ये काही ठिकाणी मुसळधार पावसाची शक्यता आहे. त्याचबरोबर मराठवाड्यातील हिंगोली, नांदेड आणि लातूर जिल्ह्यांत विजांच्या कडकडाटासह पाऊस होण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

हिंगोली, नांदेड आणि लातूर जिल्ह्यांमध्ये पुढील काही दिवसांत तुरळक ठिकाणी मेघगर्जनेसह पाऊस पडू शकतो. काही भागांत वादळी वारेही वाहण्याची शक्यता आहे. त्यामुळे विजांचा कडकडाट सुरू असताना नागरिकांनी झाडाखाली किंवा मोकळ्या मैदानात थांबणे टाळावे, असे आवाहन करण्यात आले आहे. शेतकऱ्यांनीही पिकांची आणि शेतातील साहित्याची आवश्यक ती काळजी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# मराठा बांधवांनी आजपासूनच १२ तारखेपर्यंत मुंबईत पोहचावे

### उपोषणाच्या तिसऱ्या दिवशी मनोज जरांगे पाटील यांचे समाजाला आवाहन



अंतरवाली सराटी – मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील यांच्या अंतरवाली सराटी येथील ११व्या आमरण उपोषणाचा ३१ ऑगस्ट रोजी तिसरा दिवस आहे. जरांगे पाटील यांनी मराठा बांधवांना आजपासूनच १२ तारखेपर्यंत मुंबईत पोहोचण्याचे आवाहन केले आहे. थेट आझाद मैदानात जाऊ नका. मराठे मुंबईत आल्याचे कोणालाही समजता कामा नये. पुढील १२ दिवस हे सत्र सुरू ठेवा आणि आपापल्या पाहुण्यांकडे किंवा मित्रांकडे मुक्काम करा, अशी सूचना जरांगेंनी दिली आहे. जर पोलिसांनी कारवाई करून उचलून नेले, तरी न घाबरता बिनधास्त पोलिस स्टेशनमध्ये राहा, तिथेच तुमची राहण्याची सोय होईल आणि कोणाकोणाला उचलले हे मी नंतर बघतो, असेही जरांगे म्हणाले.

आपल्या उपोषणावर ठाम असल्याचे स्पष्ट करत, आपण कोणत्याही परिस्थितीत उपोषण सोडणार नसून थेट मुंबईलाच येणार असल्याची मोठी घोषणा जरांगे यांनी केली आहे. सर्व मराठा बांधवांनी मुंबईत विभागून राहिल्यानंतर, आझाद मैदान, इतर कोणतेही मैदान किंवा थेट मुख्यमंत्र्यांचे निवासस्थान असलेल्या 'वर्षा' बंगल्यापैकी नेमके कुठे जमायचे, याचा निरोप मी स्वतः तुम्हाला देईन. तो निरोप मिळताच सगळ्यांनी त्या ठिकाणी एकत्र यायचे आहे, अशी रणनीती जरांगे पाटील यांनी जाहीर केली आहे.

### प्रकृती खालावली तरी सलाईन नाकारले

दरम्यान, उपोषणस्थळी वडीगोद्री प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. शुभम राठोड व त्यांच्या पथकाने जरांगे यांची तपासणी केली. तपासणीत त्यांची शुगर कमी झाल्याचे समोर आल्याने डॉक्टरांनी त्यांना सलाईन लावण्याचा सल्ला दिला. मात्र, जरांगेंनी उपचार घेण्यास नकार दिला. त्यानंतर दुपारी आणि सायंकाळी गेलेल्या वैद्यकीय पथकालाही त्यांनी माघारी पाठवले. सध्या त्यांचा रक्तदाब, नाडीचे ठोके आणि ऑक्सिजनची पातळी स्थिर असल्याचे डॉक्टरांनी सांगितले आहे.

### आंतरवालीत जनसागर व राजकीय पाठिंबा

उपोषणाच्या समर्थनार्थ अंतरवाली सराटीत मराठा बांधवांचे लोंढे सतत दाखल होत आहेत. जालन्याचे खासदार डॉ. कल्याण काळे यांनी जरांगे यांची भेट घेऊन पाठिंबा दिला. विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार काय म्हणतात हा त्यांचा प्रश्न, पण माझा जरांगेंना पाठिंबा आहे, असे सांगत काळे यांनी आपल्याच नेत्यांना घरचा आहेर दिला. याशिवाय बीडचे आमदार संदीप क्षीरसागर यांनीही भेट घेतली. यशवंत संघर्ष सेनेने वडीगोद्री ते अंतरवाली अशी पारंपरिक वाद्यांच्या गजरात रॅली काढत जरांगे पाटील यांना पारंपरिक काठी व घोंगडी देऊन जाहीर पाठिंबा दिला.

### १२ तारखेला राज्यव्यापी बैठक

मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावरून मनोज जरांगे पाटील यांनी पुन्हा एकदा सरकारवर जोरदार निशाणा साधला. नुसत्या चर्चा करून फायदा नाही, सरकारला तोडगा काढायचा नाहीय, असा आरोप जरांगे यांनी केला. आता १२ तारखेच्या राज्यव्यापी बैठकीत पुढील आंदोलनाची दिशा ठरवणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.


बँक लोन ऑफर
50 करोड पर्यंत लोन
प्रॉपर्टीवर लोन मिळेल
बियरबार / परमिट रूम / इंडस्ट्रीयल / हॉटेल / हॉस्पिटल / कमर्शियल / रेसीडेंशियल / शाळा / कॉलेज / इंडस्ट्रियल प्रॉपर्टी / ओपन प्लॉट वर सुद्धा लोन
जुने लोन कमी व्याजदरात ट्रान्सफर करा
8.25 % व्याजदर
Term Loan 15 year-CC/OD
संपर्क 8888826151


# 'एमओएच' रँकिंगमध्ये अहिल्यानगर महापालिका राज्यात द्वितीय क्रमांकावर

### सार्वजनिक आरोग्य सेवेत उत्कृष्ट कामगिरी, २९ महानगरपालिकांमधून मिळविले यश



'एमओएच' रँकिंगमध्ये नगर महापालिकेने राज्यात द्वितीय क्रमांक मिळविल्याबद्दल वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. सतीश राजुरकर यांचा सत्कार करताना राष्ट्रीय आरोग्य अभियानाचे राज्य आयुक्त संजय काटकर.

नगर – अहिल्यानगर महानगरपालिकेने सार्वजनिक आरोग्य सेवेत उत्कृष्ट कामगिरी करत राज्याच्या वैद्यकीय आरोग्य अधिकारी ('एमओएच') रँकिंगमध्ये राज्यात दुसरा क्रमांक पटकावला आहे. राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या राज्य कार्यालयाकडून जून २०२६ च्या पहिल्या तिमाहीसाठी जाहीर झालेल्या या क्रमवारीत राज्यातील २९ महानगरपालिकांमध्ये अहिल्यानगरने हे यश मिळवले आहे. या गौरवास्पद कामगिरीबद्दल राष्ट्रीय आरोग्य अभियानाचे राज्य आयुक्त संजय काटकर यांच्या हस्ते अहिल्यानगर महानगरपालिकेचे वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. सतीश राजुरकर यांचा सत्कार करण्यात आला.

राज्याच्या आरोग्य विभागाकडून विविध आरोग्य सेवा, उपक्रम आणि पोर्टलवरील मासिक नोंदींच्या आधारे दर महिन्याला महानगरपालिकांचे आरोग्य अधिकारी, जिल्हा आरोग्य अधिकारी व सिव्हिल सर्जन यांचे स्वतंत्र रँकिंग केले जाते. यामध्ये माता व बाल आरोग्य, गरोदर मातांची नोंदणी, लसीकरण, नवजात बालकांची काळजी, कुटुंब नियोजन व नसबंदी सेवांचा सविस्तर आढावा घेतला जातो. तसेच, असंसर्गजन्य आजारांची नोंदणी व उपचार, क्षयरोग मुक्तीसाठी राबवले जाणारे अभियान, कीटकजन्य आजारांचे सर्वेक्षण, नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रे व आपला दवाखाना येथील ओपीडी सेवा, आणि आरोग्यवर्धिनी समित्यांच्या बैठका व त्यांचे अनुपालन या सर्व निकषांवर प्रभावी कामकाज केल्यामुळे अहिल्यानगरला हे मानांकन प्राप्त झाले आहे.

आयुक्त यशवंत डांगे यांनी सांगितले की, शहरात आरोग्यविषयक सुविधा अधिक सक्षम करण्यासाठी अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना सातत्याने सूचना देऊन नवनवीन उपक्रम हाती घेतले जात आहेत. शासनाच्या माध्यमातून सुरू करण्यात आलेल्या आरोग्यवर्धिनी केंद्रांमधून नागरिकांना उत्तम दर्जाची आरोग्य सेवा उपलब्ध केली जात आहे. येत्या काळात राज्यात पहिल्या क्रमांकाचे स्थान मिळवण्याच्या दृष्टीने महानगरपालिका अधिक चांगल्या उपाययोजना राबवणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.


पाहिजेत
सोनचाफा ज्वेलरी शोरुमकरिता सेल्सगर्ल्स पाहिजे (आकर्षक पगार)
भेटा : कोहिनूर समोर, कापडबाजार, अहिल्यानगर 9356352421

नवीन गॅस कनेक्शन हवे आहे?
Regular 14.2 kg Domestic Connection सध्या उपलब्ध नाही
परंतु हे पर्यायी कनेक्शन उपलब्ध आहेत
सर्वात नवीन पर्याय
10 kg COMPOSITE ZIPLIGHT
हल्का । आधुनिक डिझाईन । नवीन कनेक्शन उपलब्ध
सिलेंडरची किंमत (Non-Refundable) Rs. 3,186
पहिली रिफिल Rs. 1,638
पहिल्यांदा एकुण भरणा ₹4,824
लक्षात ठेवा : ही Rs. 3,186 Refundable नाही
5 kg FTL COMMERCIAL
घरगुती वापरासाठी पर्यायी व्यवस्था
Refundable Deposit Rs. 1,000
रिफिल किंमत Rs. 720
सुरुवातीचा एकुण खर्च ₹1,720
Commercial refill rate लागू
19 kg COMMERCIAL
मोठ्या घरगुती गरजेसाठी पर्यायी व्यवस्था
Refundable Deposit Rs. 2,400
स्टॅम्प ड्युटी Rs.100
रिफिल किंमत Rs. 2,775
सुरुवातीचा एकुण खर्च ₹5,275
Commercial refill rate लागू
14.2 Kg STEEL DOMESTIC
(Refundable Deposit Rs 2,200 होती)
सध्या नवीन कनेक्शन उपलब्ध नाही
आमच्या सेवा
Domestic लागू Commercial LPG पुरवठा
Technical LPG Systems, Solutions & Services
Commercial Kitchens & Appliances
संपूर्ण भारतात Commercial पुरवठा व सहाय्य
Bharatgas COOK FOOD. SERVE LOVE.
ANAND GAS AGENCY
भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेडचे अधिकृत LPG वितरक
मुख्य कार्यालय : 8999346549 & Commercial LPG : 73504 74504
anandgasagency2007@.com
1,2 Snehal Apartment, Pipeline Road, Savedi, Ahilyanagar, Maharashtra - 414003
Instagram वर Follow करा _anandgasagency
किंमती बदलच्या अधीन असू शकतात.वापर लागू सुरक्षा नियम आणि कंपनीच्या अटीनुसार करा.

पाऊल टाका स्टाईलमध्ये!
एकाच छताखाली हजारो स्टाईल्सची निवड!
पुरुष । महिला । मुलांसाठी
प्रत्येक प्रसंगासाठी योग्य,आरामदायी आणि ट्रेंडी फुटवेअर
पुरुषांसाठी | महिलांसाठी | मुलांसाठी
उपलब्ध नामांकित ब्रॅण्ड्स
adidas NIKE PUMA Reebok SKECHERS asics campus sparx ABROS Bata RELAXO Paragon crocs Hush Puppies Lee Cooper RED TAPE WILDCRAFT CONVERSE KOLHAPURI मोजडी
आपल्या संपूर्ण कुटुंबासाठी फुटवेअरची परिपूर्ण शॉपिंग!
एम.जी.रोड, कापड बाजार, अहिल्यानगर
आजच भेट द्या! एकदा या.. पुन्हा याल!
फॅशन आणि मजबुतीचा पत्ता! Liberty SHOES लिबर्टी शूज एम. जी. रोड, कापड बाजार, अहिल्यानगर
SHOE PALACE शू पॅलेस सारडागल्ली,अ.नगर, मो : 9881531536

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
# नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

## फॉर्च्युनर कार खरेदी करण्याच्या बहाण्याने व्यावसायिकाची साडेसहा लाखांची फसवणूक

नगर - कार खरेदीचा व्यवहार करून उर्वरित रक्कम न देता गाडी परस्पर विल्हेवाट लावून फसवणूक केल्याचा प्रकार अहिल्यानगरमध्ये समोर आला आहे. या प्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात आरोपीविरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सावेडी येथील कुष्ठधाम रस्ता परिसरातील रहिवासी व जमीन खरेदी-विक्रीचा व्यवसाय करणारे कृष्णा दगडू शिंदे यांनी याबाबत फिर्याद दिली आहे. कर्जत येथील पाटील गल्लीत राहणारा सचिन विठ्ठलराव घुले याने ५ जुलै २०२५ रोजी प्रेमदान चौकातील एका कार्यालयासमोर कृष्णा शिंदे यांच्या टोयोटा फॉर्च्युनर कारचा (क्र. एमएच १६ डीएम ८५९५) सौदा ठरवला होता.

हा संपूर्ण व्यवहार ३४ लाख ५० हजार रुपयांना ठरला होता. सचिन घुले याने तीन दिवसांत सर्व पैसे देण्याचा विश्वास दाखवून शिंदे यांची गाडी ताब्यात घेतली. त्यानंतर त्याने व्यवहारापोटी २७ लाख ९५ हजार रुपये दिले; मात्र उर्वरित ६ लाख ५५ हजार रुपये दिले नाहीत. वारंवार मागणी करूनही शिल्लक पैसे परत न देता गाडीही परत केली नाही व ती इतर कोणाला तरी देऊन परस्पर विल्हेवाट लावली.

आपली आर्थिक फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर कृष्णा शिंदे यांनी तोफखाना पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. या तक्रारीवरून पोलिसांनी आरोपी सचिन विठ्ठलराव घुले याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम ३१६(२) नुसार गुन्हा दाखल केला आहे. पोलीस निरीक्षक बालाजी वैद्य यांच्या मार्गदर्शनाखाली या प्रकरणाचा पुढील तपास पो.कॉ. भागवत बांगर हे करत आहेत.

## मेहकरी शिवारातून विहिरीसह बोअरवेलच्या विद्युत तारांची चोरी

नगर - नगर तालुक्यातील मेहकरी गावच्या शिवारात शेतातील विहिरी आणि बोअरवेलच्या पंपांच्या कॉपरच्या विद्युत तारा चोरट्याने चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मेहकरी येथील रहिवासी व निवृत्त कर्मचारी बाबासाहेब हरी सानप (वय ७०) यांच्यासह त्यांचे शेजारी अशोक सानप आणि भास्कर सानप यांच्या शेतातील विहिरी व बोअरवेलवरील पाण्याच्या पंपांना जोडलेल्या कॉपरच्या तारा अज्ञात चोरट्याने रात्रीच्या सुमारास कापून नेल्या. २९ ऑगस्ट रोजी सायंकाळी ६ वाजेपासून ते ३० ऑगस्ट रोजी सकाळी ६ वाजेदरम्यान ही चोरी झाली. यामध्ये सुमारे १२ हजार रुपये किमतीच्या २५० फूट लांबीच्या कॉपर तारांची चोरी झाली आहे. सकाळी शेतात गेल्यानंतर हा प्रकार फिर्यादी यांच्या लक्षात आला. त्यानंतर बाबासाहेब सानप यांनी नगर तालुका पोलीस ठाण्यात जाऊन अज्ञात चोरट्याविरोधात तक्रार नोंदवली. त्यांच्या फिर्यादीवरून पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहितेनुसार चोरीचा गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस हवालदार लाड हे करत आहेत.

## भारतीय शेअर बाजाराची आठवड्याची सुरुवात पडझडीने

### सेन्सेक्समध्ये ४९१.६६ अंकांची तर निफ्टी १७८.२ अंकांची घसरण

मुंबई - अमेरिका आणि इराण यांच्यातील वाढत्या तणावामुळे कच्च्या तेलाच्या किमतीत झालेली वाढ आणि परदेशी भांडवलाचा ओघ कमी झाल्याच्या पार्श्वभूमीवर ३१ ऑगस्ट रोजी भारतीय शेअर बाजारात आठवड्याची सुरुवात मोठ्या घसरणीने झाली. सकाळच्या सत्रात सेन्सेक्समध्ये ४९१.६६ अंकांची तर निफ्टी १७८.२ अंकांची घसरण पहायला मिळाली.

जागतिक बाजारातील नकारात्मक संकेतांचा थेट परिणाम गुंतवणूकदारांच्या भावनांवर झाला, ज्यामुळे सेन्सेक्स आणि निफ्टी हे दोन्ही प्रमुख निर्देशांक घसरणीसह सुरु झाले. सकाळच्या सत्रातील आकडेवारीनुसार सेन्सेक्स ४९१.६६ अंकांनी घसरून ७६,७७२.८४ अंकांवर आला, तर निफ्टी १७८.२ अंशांच्या घसरणीसह २३,९९७.९५ अंकांपर्यंत खाली घसरला होता. त्यानंतर थोडी रिकव्हरी झाली. मात्र बाजारातील नफा वसुलीमुळे पुन्हा बाजार आणखी खाली आला. निफ्टीचे सर्व क्षेत्रीय निर्देशांक लाल निशाण्यावर असून, निफ्टी स्मॉलकॅप १०० आणि निफ्टी मिडकॅप १०० या दोन्ही निर्देशांकांमध्ये प्रत्येकी १ टक्यांची घसरण नोंदवली गेली आहे.

सेन्सेक्समधील ३० कंपन्यांपैकी सुरुवातीला एटरनल (१.५७% वाढ), एचडीएफसी बँक (१.२५% वाढ), भारती एअरटेल आणि आयसीआयसीआय बँक यांनी काहीशी वाढ दर्शवली. मात्र, बाजाराला सकारात्मक दिशा देण्यात या कंपन्यांची वाढ पुरेशी ठरली नाही. त्यामुळे दुपारच्या सत्रातही बाजारातील लाल निषाण कायम असल्याचे दिसून आले.

तर टाटा स्टील (२.१८% घट), इन्फोसिस (२.१६% घट), बजाज फायनान्स (२.०६% घट), इंडिगो (२.०५% घट) आणि अदानी पोर्ट्स (१.५९% घट) या कंपन्यांच्या शेअर्समध्ये मोठी विक्री पाहायला मिळाली.

## मुकुंदनगरमधील धीरज परदेशी खून प्रकरणाच्या तपासावरच संशय

### 'एसआयटी'कडे तपास सोपविण्याची 'सकल हिंदू समाजाची पोलीस अधीक्षकांकडे मागणी



धीरज परदेशी खून प्रकरणाच्या तपासासाठी एसआयटी स्थापन करण्याची मागणी पोलीस अधिक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या कडे निवेदनाद्वारे करताना आ.संग्राम जगताप व सकल हिंदू समाजाचे शिष्टमंडळ.

नगर - अहिल्यानगर शहरातील मुकुंदनगर येथील धीरजसिंग कचरूसिंग (राजपूत) परदेशी खून प्रकरणाच्या तपासावर प्रश्नचिन्ह उपस्थित करत सकल हिंदू समाज, अहिल्यानगर यांच्या वतीने स्वतंत्र विशेष तपास पथक (एसआयटी) स्थापन करण्याची मागणी करण्यात आली आहे.

याबाबत आ.संग्राम जगताप यांच्या नेतृत्वाखाली सकल हिंदू समाजाच्या शिष्टमंडळाने पोलीस अधिक्षक मुम्मका सुदर्शन यांची भेट घेवून निवेदन दिले. यामध्ये म्हंटले आहे की, पोलिसांनी न्यायालयात सादर केलेल्या रिमांड रिपोर्टमध्ये 'जुन्या वादातून खून' झाल्याचा दावा करण्यात आल्याचे निवेदनात म्हटले आहे. मात्र, संबंधित एफआयआर मध्ये धीरज परदेशी यांचे नाव नसल्याचा तसेच सीसीटीव्ही फुटेजमध्येही ते दिसत नसल्याचा दावा निवेदनकर्त्यांनी केला आहे.

घटनेच्या दिवशी धीरज परदेशी हे सावेडी येथील कामावर हजर होते आणि त्यांनी वरिष्ठांना जीपीएस लोकेशनचे फोटो पाठविल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे पोलिसांच्या दाव्यांची एफआयआर, सीसीटीव्ही, जीपीएस व अन्य उपलब्ध पुराव्यांच्या आधारे स्वतंत्रपणे पडताळणी करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. खुनामागील नेमके कारण स्पष्ट झाले पाहिजे; तपासात कोणतीही पोकळी राहता कामा नये, अशी भूमिका घेत सकल हिंदू समाजाने सध्याच्या तपासी अधिकाऱ्यांकडून तपास काढून स्वतंत्र एसआयटी कडे तपास वर्ग करण्याची मागणी पोलीस अधीक्षकांकडे केली आहे.


## जमुनाबाई सारसर यांचे अल्प आजाराने निधन



नगर - नालेगाव, गोगादेव मंदिरा शेजारील रहिवासी जमुनाबाई छन्नु सारसर (वय ७२) यांचे ३० ऑगस्ट रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव, अमरधाम येथे करण्यात आले.

त्यांच्या मागे १ मुलगा, सुन, नातवंडे असा परिवार आहे. आनंद छन्नु सारसर यांच्या त्या आई होत.

## बाजीराव मुरकुटे यांचे अल्प आजाराने निधन



नगर - भोसले आखाडा, बुरुडगाव रोड येथील रहिवासी बाजीराव सयाजी मुरकुटे (वय ७३) यांचे ३० ऑगस्ट रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव, अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे पत्नी, १ मुलगी, जावई, नातवंडे असा परिवार आहे. मुरकुटे हे जिल्हा बँकेचे कामगार नेते, एडीसीसी बँकेचे सिनियर ऑफीसर, श्रीगोंदा साखर कारखान्याचे माजी संचालक होते. माजी आमदार स्व. अरुणकाका जगताप यांचे ते मेहुणे तर आ. संग्राम जगताप, सचिन जगताप यांचे मामा होत.

## जामगाव नाला, सीना नदीवरील अतिक्रमणाविरोधात ग्रामस्थ आक्रमक

### अनधिकृत पूल व भरावामुळे पावसाळ्यात पुराचा धोका; २ सप्टेंबरला 'रास्ता रोको'चा इशारा

नगर - जामगाव नाला, सीना नदीपात्र तसेच चौपदरी वस्ती व नेप्ती परिसरातील अनधिकृत पूल व अतिक्रमणाचा प्रश्न गंभीर बनला आहे. सदर अतिक्रमण तातडीने हटवून नदी-नाल्याचा नैसर्गिक प्रवाह मोकळा करावा, अशी मागणी ग्रामस्थांनी जलसंधारण व पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. प्रशासनाने अतिक्रमण न काढल्यास २ सप्टेंबर रोजी सकाळी ९ वाजता नगर-कल्याण महामार्गावरील छत्रपती इंजिनिअरिंग कॉलेजसमोर रास्ता रोको आंदोलन करण्यात येईल, असा स्पष्ट इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.

ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, जामगाव नाला व सीना नदीवरील अनधिकृत पूल तसेच त्यासाठी करण्यात आलेला भराव यामुळे पाण्याच्या नैसर्गिक प्रवाहाला अडथळा निर्माण होत आहे. पावसाळ्यात मोठ्या प्रमाणात पाणी आल्यास परिसरातील शेतजमिनी व पिकांचे नुकसान होण्याची शक्यता असून, जीवितहानीचा धोकाही निर्माण होऊ शकतो. त्यामुळे प्रशासनाने या प्रकरणाकडे गांभीर्याने पाहण्याची मागणी करण्यात आली आहे.

यापूर्वी ९ जून २०२६ रोजी ग्रामस्थांनी संबंधित अतिक्रमण व अनधिकृत पुलाबाबत प्रशासनाकडे अर्ज केला होता. त्यानंतर १७ जून रोजी शेतकऱ्यांनी आंदोलनाचा इशारा दिला होता. आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर तहसीलदार व संबंधित अधिकाऱ्यांनी कारवाईचे आश्वासन दिल्याने ग्रामस्थांनी आंदोलन स्थगित केले होते. मात्र, आश्वासनानंतरही अतिक्रमण हटविण्याची ठोस कार्यवाही झालेली नसल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.

या प्रकरणी भूमिअभिलेख विभागाकडून संबंधित जमिनीची मोजणी करण्यात आल्याचे निवेदनात नमूद आहे. मोजणी झाल्यानंतरही पुढील कारवाई झालेली नसल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी आहे. अतिक्रमणामुळे भविष्यात पावसाचे पाणी शेतांमध्ये घुसून मोठ्या प्रमाणात नुकसान होण्याची भीती शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे.

प्रशासनाने तातडीने अतिक्रमण हटवून अनधिकृत पूल व भरावाबाबत कारवाई करावी, अन्यथा २ सप्टेंबर रोजी सकाळी ९ वाजता नगर-कल्याण महामार्गावरील छत्रपती इंजिनिअरिंग कॉलेजसमोर रास्ता रोको आंदोलन करण्यात येईल, असा इशारा चौपदरी वस्ती व नेप्ती परिसरातील ग्रामस्थांनी दिला आहे.

## चंद्रभागाबाई मोरे यांचे वृद्धापकाळाने निधन



नगर - खडकी, ता.नगर येथील चंद्रभागाबाई महादू मोरे (वय ८५) यांचे ३१ ऑगस्ट रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर खडकी अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे सुन, नातवंडे, २ मुली, जावई असा परिवार आहे.

## हेमंत सूर्यकांत धोका यांचे निधन



नगर - येथील आनंद ट्रान्स्पोर्ट, ट्रॅव्हल्स तसेच विणा वर्ल्ड एजन्सीचे संचालक हेमंत सूर्यकांत धोका (वय ४५) यांचे २९ ऑगस्ट २०२६ रोजी निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे ३० ऑगस्ट रोजी अंत्यसंस्कार करण्यात आले.त्यांच्या पश्चात वडील सूर्यकांत धोका, पत्नी, दोन मुल काव्या आणि नीरज धोका, बंधू ईश्वर, निलेश, पियुष, अक्षय असा परिवार आहे.

## गणेश दुसा यांचे दु:खद निधन



नगर - कल्याण रोड, शिवाजीनगर येथील रहिवासी गणेश मधुकर दुसा (वय ५८) यांचे २८ ऑगस्ट रोजी दु:खद निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे पत्नी, १ मुलगा, १ मुलगी, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

## अंबादास बहिरट यांचे वृद्धापकाळाने निधन



नगर - खडकी, ता.नगर येथील अंबादास विठोबा बहिरट (वय ८०) यांचे ३१ ऑगस्ट रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर खडकी अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे २ मुले, सुना, नातवंडे, १ मुलगी, जावई असा परिवार आहे. विद्यमान सरपंच भाऊसाहेब बहिरट, बाळासाहेब बहिरट यांचे ते वडील होत.

## शारदाताई सपकाळ यांचे निधन



नगर - राहुरी येथील कै. शारदाताई गुलाबराव सपकाळ (वय ८७) यांचे ३० ऑगस्ट रोजी अल्पशः आजाराने निधन झाले. त्यांचा अंत्यविधी गणपती घाट, राहुरी येथे करण्यात आला. यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. मनमिळावू स्वभाव व धार्मिक प्रवृत्तीच्या असल्याने ते सर्वांना सुपरिचित होत्या. त्यांच्या पश्चात एक मुलगा, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. भिंगार अहिल्यानगर राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष व हरदिन मॉर्निंग ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष संजय सपकाळ यांच्या त्या चुलती होत.

## रायसोणी पतसंस्थेच्या ठेवीदारांनी एकत्र येण्याचे आवाहन

नगर - रायसोणी पतसंस्थेच्या जळगाव येथील मुख्य कार्यालयाची सध्या जीर्णशीर्ण अवस्था झाली असून, यात अडकलेल्या ठेवीदारांना त्यांचे पैसे परत मिळण्याबाबत संभ्रम निर्माण झाला आहे. या पार्श्वभूमीवर नगर अर्बन बँक बचाव संघर्ष समितीचे सचिव व ठेवीदार डी. एम. कुलकर्णी यांनी निवेदनाद्वारे ठेवीदारांमध्ये जागृती करत स्वतःच्या हक्काच्या रक्कमेसाठी सर्वांनी एकत्र येण्याचे आवाहन केले आहे

कुलकर्णी यांनी सांगितले की, नुकतीच त्यांनी ९ ते १० ठेवीदारांसह जळगाव येथील रायसोणी पतसंस्थेच्या कार्यालयाला भेट दिली. तेथील प्रत्यक्ष वस्तुस्थिती अतिशय बिकट आणि चिंताजनक आहे. संस्थेचे नियुक्त अवसायक गौतम बलसाने हे केवळ सोमवारी थोड्या वेळासाठीच कार्यालयात येतात; कारण त्यांच्याकडे इतर दोन संस्थांचाही अतिरिक्त कार्यभार आहे. संस्था अवसायनात आल्याने खर्चाचा भार कमी करण्यासाठी कर्मचारी कपात करण्यात आली असून, जुन्या सेवकांपैकी केवळ प्रमोद माळी आणि अन्य ४ ते ५ कर्मचारीच कार्यरत असल्याचे दिसून आले.

ठेवीदारांमध्ये चिंता संस्थेच्या कर्जाबाबत व वसुलीबाबत चौकशी केली असता, थकीत कर्जाचे प्रमाण प्रचंड असून वसुलीचे काम पूर्णपणे ठप्प असल्याचे समोर आले. यामुळे कुलकर्णी यांनी ठेवीदारांच्या भवितव्याबाबत गंभीर चिंता व्यक्त करत त्यांना एकत्र येण्याचे आवाहन केले आहे.

## बँक कर्ज फेडले नाही, कर्जदारास कर्ज व्याजासह भरण्याचा आदेश

नगर - अहिल्यानगर येथील मे. चिफ ज्युडीशियल मॅजिस्ट्रेट साहेब, कोर्ट नं.३, श्रीमती प्रतिभा ए. पाटील यांचे न्यायालयात वादी असलेली बँक ऑफ महाराष्ट्र, शाखा- वाकोडी फाटा, अहिल्यानगर या बँकेने कर्जदार मुकेश शिवाजी भिंगारदिवे व सहकर्जदार बबन शिवाजी भिंगारदिवे यांचे विरूद्ध वसुली दावा दाखल केला होता. सदर कर्जदार यांना शेळीपालन व्यवसायासाठी दि. २१/०८/२०१७ रोजी कर्ज रक्कम रू. ३,७५,०००/- मंजूर केले होते. सदरचे कर्ज कर्जदार यांनी वापरले होते, परंतू कर्जदार व सहकर्जदार यांनी सदरचे कर्ज वापरून देखील त्यावरील व्याज व मुद्दल रक्कम नियमितपणे भरत नसल्यामुळे सदरचे कर्ज थकीत झाले होते त्यामुळे वादी बँकेने अनेकदा लेखी व तोंडी स्वरूपात कर्जदारांना थकीत कर्ज व व्याज भरण्याबाबत कळवले होते. परंतू, कर्जदार व सहकर्जदार यांनी सदरचे कर्ज न भरता थकीत केले होते म्हणून वादी बँकेने दोन्ही कर्जदारांविरूद्ध वसुली दावा अहिल्यानगर येथे मे. चिफ ज्युडी. मॅजिस्ट्रेट साहेब, (सिनि. डिव्हीजन) यांचे कोर्टात दाखल केला होता. सदर वसुली दाव्यामध्ये वादी बँकेच्या वतीने दाखल केलेल्या उच्च न्यायालयाचे न्यायनिवाडे ग्राह्य धरून मे. न्यायालयाने सदर वसुली दाव्याचा निकाल वादी बँकेच्या बाजूने पारित केलेला असून सदर दोन्ही कर्जदारास दावा रक्कम रू.८,०८,५७६.६५ पैसे व त्यावरील व्याज १०.७० टक्के प्रमाणे दावा दाखल तारखेपासून भरण्याचा आदेश केलेला आहे. थकीत कर्ज रक्कम न भरल्यास मालमत्ता जप्तीचा आदेश देखील केलेला आहे. सदर वसुली दाव्यामध्ये वादी बँकेच्या वतीने अ‍ॅड. राजेश आर. तिवारी यांनी काम पाहिले.


## अलकाबाई सरोदे यांचे अल्प आजाराने निधन



नगर - दसरेनगर, वसंत टेकडी येथील रहिवासी श्रीमती अलकाबाई गजानन सरोदे (वय ७६) यांचे ३० ऑगस्ट रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव, अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे २ मुले, २ मुली, सुना, नातवंडे, जावई असा परिवार आहे. योगेश सरोदे यांच्या त्या मातोश्री होत.

## नारायणराव देशमुख यांचे निधन



नगर - कोरडगाव (ता. पाथर्डी) येथील ग्रामपंचायतीचे माजी सरपंच व सेवा सोसायटीचे माजी चेअरमन नारायणराव भगवंतराव देशमुख (वय ८९) यांचे अल्पशा आजाराने २९ ऑगस्ट रोजी निधन झाले. त्यांच्यामागे पत्नी, दोन मुले, तीन मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे. कृषी, शैक्षणिक, राजकीय, सामाजिक अशा सर्वच क्षेत्रांमध्ये परिसरात त्यांचा मोठा नावलौकिक होता. रयत शिक्षण संस्थेच्या न्यू इंग्लिश स्कूलच्या शाला समितीवर कार्यरत असताना त्यांनी मोठे काम केले होते. सेवानिवृत्त शिक्षक मुरलीधर देशमुख व विष्णू देशमुख यांचे ते बंधू होत.

## माणिकचंद गांधी यांचे संथाराव्रतात निधन



श्रीरामपूर - येथील मदर तेरेसा चौक प्रशासकीय कार्यालयाजवळ, कॉलेज रोड येथील रहिवासी माणिकचंद मोतीलाल गांधी (वय ६७) यांचे ३१ ऑगस्ट रोजी संथारा व्रतात निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर ३१ ऑगस्ट रोजी अंत्यसंस्कार करण्यात आले.त्यांच्या मागे १ भाऊ, १ मुलगा, १ मुलगी, सुन, पुतणे, जावई, नातवंडे असा परिवार आहे. रमणलाल गांधी यांचे ते धाकटे बंधू तर मयुर गांधी यांचे वडील, रोहित, नयन गांधी यांचे चुलते होत. प्रशासकीय इमारत समोरील माणिक किराणा व रॉकेलचे ते विक्रेते होत.

## खंडणीसह दरोड्याच्या गुन्ह्यातील फरार आरोपी जेरबंद



खंडणीसह दरोड्याच्या गुन्ह्यातील फरार आरोपीला पकडल्यानंतर त्याच्या समवेत स्थानिक गुन्हे शाखेचे पथक.

नगर - खंडणी मागून चाकू व गावठी कट्ट्याचा धाक दाखवत सोन्याची चेन जबरीने लुटल्याप्रकरणी फरार असलेल्या मुख्य आरोपीला स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने नगर शहरात जेरबंद केले. सुधीर संभाजी शिरसाठ (वय ३०, रा. आसरानगर, पाथर्डी, जि. अहिल्यानगर) असे अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, १२ ऑगस्ट रोजी फिर्यादी राहुल रामराव गर्जे (रा. फुलेनगर, ता. पाथर्डी) हे घरी जात असताना आरोपी सुधीर शिरसाठ व त्याच्या साथीदारांनी त्यांची गाडी अडवली. आरोपींनी फिर्यादीकडे अडीच लाख रुपयांची खंडणी मागितली. तसेच फिर्यादीच्या गळ्याला चाकू लावून व गावठी कट्ट्याचा धाक दाखवत त्यांच्या गळ्यातील सोन्याची चेन जबरीने काढून घेतली. या घटनेप्रकरणी पाथर्डी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

गुन्हा दाखल झाल्यानंतर आरोपी फरार झाले होते. आरोपींच्या शोधासाठी पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या सूचनेनुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांनी पोलीस उपनिरीक्षक संदिप दरवडे तसेच पोलीस अंमलदार विष्णू भागवत, सोमनाथ झांबरे, अशोक लिपणे, फुरकान शेख, किशोर शिरसाठ व आजिनाथ पाखरे यांचे पथक नियुक्त केले.

दरम्यान, २९ ऑगस्ट रोजी मुख्य आरोपी सुधीर शिरसाठ हा अहिल्यानगर येथील हॉटेल सगम येथे असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार पोलिसांनी शिरसाठला ताब्यात घेतले. त्याला पुढील तपासासाठी पाथर्डी पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

## पकडलेला एलपीजी गॅसचा टँकर सोडण्याचे आदेश

नगर - केडगाव येथील बाजार समिती बायपास रोड येथील एका एलपीजी गॅस टँकरमधून अनधिकृतपणे व्यावसायिक गॅस टाक्या भरल्या जात असल्याच्या आरोपात जप्त करण्यात आलेला भारत पेट्रोलियम कंपनीचा एलपीजी गॅस टँकर जिल्हाधिकाऱ्यांनी सोडण्याचे आदेश दिले आहेत. या गुन्ह्यात कंपनीचा कोणताही संबंध नसल्याचे आणि सबळ पुरावा उपलब्ध नसल्याचे स्पष्ट करत हा टँकर व गॅस मूळ मालकाला परत मिळवून देण्यात अ‍ॅड. सचिन पाठक यांना यश आले आहे.

या प्रकरणी यापूर्वी कोतवाली पोलीस स्टेशनमध्ये बीएनएस २०२३ चे कलम २८७, २८८ तसेच जिवनावश्यक वस्तू कायदा, स्फोटक कायदा, पेट्रोलियम आणि एलपीजी कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर गुन्ह्यात भारत पेट्रोलियम कंपनीचा एलपीजी गॅस टँकर जप्त करण्यात आला होता. दरम्यान, जप्त करण्यात आलेला मुद्देमाल परत मिळवण्यासाठी अ‍ॅड. सचिन पाठक यांनी अहिल्यानगरचे जिल्हाधिकारी यांच्यासमोर कायदेशीर अर्ज दाखल केला होता. सुनावणीदरम्यान अ‍ॅड. पाठक यांनी प्रखर युक्तिवाद केला आणि विविध कागदपत्रे पुरावा म्हणून सादर केली. गुन्ह्यामध्ये आरोपींविरुद्ध कोणताही ठोस पुरावा उपलब्ध नसून सदर एलपीजी गॅस टँकरचा या गुन्ह्याशी थेट संबंध नाही, असा युक्तिवाद करण्यात आला. तसेच, भारत पेट्रोलियम ही एक प्रतिष्ठित व भारत सरकारशी संलग्न अधिकृत कंपनी असल्याने या प्रकरणात कंपनीला विनाकारण गोवण्यात आले असल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले.

जिल्हाधिकाऱ्यांसमोर मांडलेला हा युक्तिवाद आणि सादर केलेले सर्व पुरावे ग्राह्य धरत न्यायालयाने सदर अर्ज मंजूर केला असून, भारत पेट्रोलियमचा एलपीजी गॅस टँकर मुक्त करण्याचे आदेश पारित केले आहेत, अशी माहिती अ‍ॅड. पाठक यांनी दिली.

## सुनील पावले यांना विश्वकर्मा पुरस्कार जाहीर



नगर - विश्वकर्मा सोशल वेलफेअर फौंडेशन ट्रस्ट, पुणे यांच्या वतीने दरवर्षी दिला जाणारा विश्वकर्मा पुरस्कार यंदा अहिल्यानगरचे सुनील अविनाश पावले यांना जाहीर झाला आहे. हा पुरस्कार सोहळा व विद्यार्थी गुणगौरव समारंभ ६ सप्टेंबर रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला आहे. या सोहळ्यात त्यांना सन्मानपूर्वक पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे, अशी माहिती संस्थापक विश्वस्त विवेकानंद पांडुरंग सुतार यांनी दिली.

# एसाच्या नूतन संचालक मंडळाने स्वीकारला पदभार



एसाच्या नूतन पदाधिकाऱ्यांना रवींद्र मुळे आणि आशिष भाबडा यांच्या हस्ते नेमप्लेट लावून पदभार सोपविण्यात आला. (छाया – लहू दळवी)

नगर – आर्किटेक्ट्स, इंजिनीअर्स ॲण्ड सर्व्हेअर्स असोसिएशन (एसा) आणि पोलाद स्टील, जालना यांच्या संयुक्त विद्यमाने एसाच्या नूतन संचालक मंडळाचा पदग्रहण सोहळा नुकताच मोठ्या उत्साहात झाला. या कार्यक्रमास पोलाद स्टील, जालनाचे असिस्टंट व्हाईस प्रेसिडेंट आशिष भाबडा यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी राजाभाऊ उर्फ रवींद्र मुळे यांचे आत्मनिर्भर भारत–विश्वगुरू भारत या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

अतिथी रवींद्र मुळे आणि आशिष भाबडा यांच्या हस्ते नूतन पदाधिकाऱ्यांना प्रतीकात्मक नेमप्लेट लावून पदभार सोपविण्यात आला. यामध्ये नूतन अध्यक्ष प्रदिप तांदळे, उपाध्यक्ष सुनील औटी, सचिव भूषण पांडव, खजिनदार संतोष खांडेकर, सहसचिव अनमोल जैन यांच्यासह संचालक अन्वर शेख, सुनील जाधव, सचिन डागा, संकेत पादिर, अमोल येनगंदुल, आदिनाथ आंबेकर, सागर ढगे, गौरव मांडगे, अमेय कुलकर्णी आणि विजय उजनीमठ यांचा समावेश आहे.

कार्यक्रमादरम्यान संस्थेच्या मागील ४० वर्षांच्या वाटचालीचा आढावा चलचित्र व ध्वनीमुद्रणाच्या माध्यमातून सादर करण्यात आला. संस्थेच्या उभारणीपासून आजपर्यंत विविध माजी अध्यक्ष व ज्येष्ठ सभासदांनी दिलेल्या योगदानाची दखल घेत त्यांचे आभार मानण्यात आले.

पोलाद स्टीलचे आशिष भाबडा यांनी नूतन संचालक मंडळाचे अभिनंदन करून आगामी कारकिर्दीसाठी शुभेच्छा दिल्या. तसेच पोलाद स्टीलच्या वतीने एसाच्या विविध उपक्रमांना आवश्यक ते सहकार्य करण्याचे आश्वासन त्यांनी दिले.

नूतन अध्यक्ष प्रदिप तांदळे यांनी आपल्या मनोगतात आगामी वर्षातील संस्थेच्या विविध संकल्पांची माहिती दिली. एसा भवनचे काम पूर्ण करणे तसेच शासकीय विभागांमध्ये काम करताना सभासदांना येणाऱ्या विविध अडचणी सोडविण्यास प्राधान्य दिले जाणार असल्याचे त्यांनी सांगितले. याशिवाय पोलाद स्टीलच्या सहकार्याने शाळांमध्ये तारांगण उपक्रम राबविणे, तांत्रिक सेमिनार, प्लांट व शॉप व्हिजिट्स, बेस्ट स्ट्रक्चर व्हिजिट व प्रेझेंटेशन, लेखमाला, मुलाखत मालिका, कौटुंबिक उपक्रम तसेच क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

मुख्य अतिथी राजाभाऊ मुळे यांनी आत्मनिर्भर भारत–विश्वगुरू भारत या विषयावर मार्गदर्शन केले. हडप्पा आणि मोहेंजोदडो येथील टाऊन प्लॅनिंगचे अवशेष हे भारताच्या प्राचीन समृद्ध संस्कृतीची आणि आत्मनिर्भरतेची साक्ष देतात, असे त्यांनी सांगितले.

नवीन पिढीला व्यावसायिक शिक्षण देऊन स्थापत्य कलेकडे त्यांचा कल वाढविणे गरजेचे आहे. मातृभाषेतून अभियांत्रिकी व वैद्यकीय शिक्षण मिळणे, क्षेपणास्त्रांची निर्यात आणि सेमीकंडक्टर प्लांटची उभारणी ही भारताच्या प्रगतीची लक्षणे असल्याचे त्यांनी नमूद केले. कोरोना काळात भारताने स्वदेशी लस विकसित करून जगाला मदत केली. खेड्यांचा विकास, रामराज्याची संकल्पना आणि योग यांच्या माध्यमातून २०४७ पर्यंत भारत जगात शांतता प्रस्थापित करणारा आणि विकसित राष्ट्र म्हणून उभा राहील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

पदग्रहण सोहळ्यास इन्स्टिट्यूट ऑफ इंटेरियर डिझायनर्सचे सूरज ननावरे, तुषार भांबरे, सांची बार्शीकर, अमोल खोले, अवतार हिरा, अजय अपूर्वा, इंटेरियर डिझायनर असोसिएशनचे सागर कंदुर, उमेश जाजू, ब्रिजेश शहा, आर्किटेक्ट असोसिएशनचे प्रल्हाद जोशी, संतोष गायकवाड, तेजस दार्वेकर, रोटरी मिड टाउनचे हेमंत कराळे, विनोद मोरे, क्रेडाईचे प्रसाद आंधळे, बिल्डर असोसिएशनचे महेश गुंदेचा तसेच इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअर्स (इंडिया), अहिल्यानगर सेंटरचे भारत भूषण भागवत, दीपक विधाते, अभय राजे, दादासाहेब करंजुले, हरिश्चंद्र थिगळे आदी उपस्थित होते. तसेच पोलाद स्टीलचे सुशांत गव्हाणे, आदेश गुंगे आणि एसाचे एस. यु. खान, दिलीप कर्णावट, मकरंद देशपांडे, अजित माने, सुरेश परदेशी, प्रकाश जैन, अनिल धोकरिया, इक्बाल सय्यद, विजयकुमार पादिर, अजय दगडे, अशोक मवाळ, विकार काझी, संजय चांडवले, रत्नाकर कुलकर्णी यांच्यासह एसाचे सभासद उपस्थित होते. सूत्रसंचालन वीणा दिघे यांनी केले. एसाचे सचिव भूषण पांडव यांनी आभार मानले.

# प्रेरणादायी अक्षरधन

## दुष्टाला सज्जनाचा धाक वाटावा

“मुसाफिर”

संकलन: दिशान फिचर्स




चांगला माणूस बिघडला, कारण तो वाईट माणसाच्या संगतीत राहिला. संगतीमुळे हा बदल घडला? चांगला वाईट झाला? पण का? वाईट का नाही चांगला बनला? चांगुलपणा कमी पडला? वाईटपणा बलवत्तर ठरला? माणूस उत्तर शोधायला लागला.

एक माणूस मनाने सज्जन. त्याचे आत्मबल सधन. एकदा वाईटाशी त्याची घडली संगती. ते बनले एकमेकांचे सोबती. सज्जनाचा प्रभाव किती? वाईट माणसाला लाभली सन्मती. त्याच्या प्रवृत्ती बदलल्या. मन असावे कणखर. दुसऱ्याच्या दुष्ट प्रवृत्तीपेक्षा आपली सज्जनवृत्ती असावी प्रखर त्यामुळे दुष्टाच्या अवयी गेल्या विलयाला. चारही दिशा आपल्या सुगंधानं दरवळून टाकणारी नाजूक फुले पडली मातीत. पण मातीचा वास का लागला त्या फुलांना? छे उलट माती झाली सुगंधित.

संगतीमुळे जेव्हा कुणी बिघडतो, तेव्हा इतका का तो दुबळा होतो? कमकुवत मन, मोहाचे आले क्षण. सुटला त्याचा संयम. झाला व्यसनी कायम. दोष दुसऱ्याच्या माथी मारणे हा माणसाचा नियम. बा माणसा, तू मुळात सज्जन. त्याचा दुष्टाला वाटावा धाक. दुष्टाला वाटले पाहिजे. हा होउ शकतो आपल्यापेक्षाही अधिक दुष्ट, तरी पण हा घेतो किती कष्ट। आवरताना दिसतो स्वतःला स्पष्ट। पण याने स्वतःला आवरलं नाही तर मी होईन नष्ट. असे सामर्थ्य जाणावे सज्ञनतेचे. तुकाराम महाराज म्हणतात. मायबापाहुनी बहु मायावत। करत घातपात शत्रुहुनी। अमृत ते काय गोड आम्हापुढे। विष ते बापुडे कडू तुका म्हणे आम्ही अवघेचि गोड। ज्याचे पुरे कोड त्याचे परि।।

आम्ही पूर्णाशाने गोड. सज्ञनतेने भरलेले आमुचे अणुरेणु. अजोड. पण जमलाच दुष्टाशी जोड, तर? एरवी मायबापापेक्षाही आम्ही हळवे, पण दुष्टाला स्पष्ट जाणवावे, की हे आपला घात करुनही उरावे, एवढे बलदंड। त्या धाकापायी जावा त्याचा दुर्जनगंड । आम्ही तसे अमृतापेक्षाही गोड, पण प्रसंग पडला तर विषालाही लाजवू. देउ त्यालाही आव्हान. अरे, कसला रे मिळमिळीत तुझा कडूपणा, आमचे बल पाहून विषदेखील सोडले त्याचा घातपाती दुर्गुण. सज्ञनाजवळ असावी एवढी ताकद. जो आमच्या येईल संगे, त्याच्यासाठी झिजू अंगे. पुरवू त्याचे लाड, पाहू तर कसला टिकतो आमच्या पुढे तो लबाड.

सुर्याची किरणे पडतात चिखलात झालीत का म्हणून ती कधी मलीन? मळलेली दिसली ती कधी दीन. सुर्य नाही मळत, उलट चिखलच वाळतो. असे असावे सज्ञनाचे बळ, कसा टिकेल त्यापुढे दुर्जनतेचा मळ ? उलट दुर्जनच होईल शुद्ध सज्ञन..

– किशोर गांधी

# भगवान जिव्हेश्वर जन्मोत्सवानिमित्त मोफत आरोग्य शिबिरात २१० रुग्णांची तपासणी

नगर – स्वकुळ साळी हितसंवर्धक मंडळ, अहिल्यानगर, साईदीप सह्याद्री हॉस्पिटल आणि अहमदनगर महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने भगवान श्री जिव्हेश्वर जन्मोत्सवानिमित्त मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात २१० रुग्णांची तपासणी करण्यात येवून त्यांना आरोग्यविषयक मार्गदर्शन करण्यात आले.

या शिबिराचे उद्‌घाटन मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आले. यावेळी स्वकुळ साळी हितसंवर्धक मंडळाचे विश्वस्त प्रमुख विक्रम पाठक, कार्याध्यक्ष लक्ष्मीकांत तरोटे, संजय सागांवकर, बाबासाहेब वैद्य, उत्सव समिती प्रमुख निरज चांगटे, महेश सागांवकर, राम काळे, सुनील पावले, संजय दळवी, सुरेश इंगळे, सचिन मडके, अनिल भंडारे, गजेंद्र सोनवणे, वर्षा कोल्हे, छाया साळी, वनिता पाटेकर, अभिजीत अष्टेकर, गणेश झिंजे, किशोर विंचुरकर, प्रशांत भंडारे, प्रदीप दळवी, गणेश दळवी, प्रसाद कांबळे, योगेश पांढरपोरे आदी उपस्थित होते.

शिबिरामध्ये डॉ. रुषिकेश कराळे, डॉ. रमिज मुसानी, जनसंपर्क अधिकारी रविंद्र वाघाडे, डॉ. रच्या कंचन (स्त्रीरोग तज्ज्ञ), डॉ. सुडके (म.न.पा.), सानप सिस्टर यांनी नागरिकांची आरोग्य तपासणी करून मार्गदर्शन केले.

यावेळी स्वकुळ साळी हितसंवर्धक मंडळाचे विश्वस्त प्रमुख विक्रम पाठक म्हणाले, आराध्य दैवत भगवान जिव्हेश्वरांच्या जन्मोत्सवानिमित्त केवळ धार्मिक कार्यक्रम न घेता सामाजिक बांधिलकी म्हणून आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. समाजातील प्रत्येक घटक निरोगी राहावा हाच या उपक्रमाचा उद्देश असून भविष्यातही असे सेवाभावी उपक्रम राबविले जातील, असे त्यांनी सांगितले. शिबिराला समाज बांधव व नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला असून अनेकांनी आरोग्य तपासणी करून लाभ घेतला.

# २९ वर्षांच्या सेवेनंतर स्टेनोग्राफर नजीरहुसेन पीरजादे सेवानिवृत्त



येथील जिल्हा न्यायालयातून सेवानिवृत्त झालेले पीरजादे नजीरहुसेन यांचा सेवापूर्तीनिमित्त सत्कार करण्यात आला

नगर – जिल्हा न्यायालयातील स्टेनोग्राफर म्हणून प्रदीर्घकाळ कार्यरत राहिलेले पीरजादे नजीरहुसेन हे सुमारे २९ वर्षांच्या प्रामाणिक, कर्तव्यनिष्ठ व समर्पित सेवेनंतर सेवानिवृत्त झाले. त्यांच्या सेवापूर्तीनिमित्त अहिल्यानगर स्टेनोग्राफर्स असोसिएशनच्या वतीने सावेडी येथील हॉटेल सेज अँड साल्ट येथे सेवापूर्ती सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी असोसिएशनच्या वतीने त्यांचा सन्मानपूर्वक सत्कार करून त्यांच्या प्रदीर्घ सेवाकार्याचा गौरव करण्यात आला.

पीरजादे यांनी न्यायालयीन सेवेत प्रवेश करण्यापूर्वी दोन नामांकित कंपन्यांमध्ये सुमारे सहा वर्षे स्टेनोग्राफर म्हणून सेवा बजावली. त्यानंतर दि. ९ जून १९९७ रोजी संगमनेर येथे कनिष्ठ लिपिक म्हणून शासकीय सेवेत प्रवेश केला. कार्यकुशलता, मेहनत आणि अनुभवाच्या जोरावर त्यांनी स्टेनोग्राफर लोअर ग्रेड, हायर ग्रेड अशी पदोन्नती मिळवत स्टेनोग्राफर ग्रेड–१ अर्थात राजपत्रित अधिकारी, वर्ग–२ या पदापर्यंत यशस्वी मजल मारली.

न्यायव्यवस्थेतील प्रदीर्घ सेवाकाळात त्यांनी अचूकता, वेळेचे भान, जबाबदारीची जाणीव आणि कर्तव्यनिष्ठा यांना नेहमीच प्राधान्य दिले. न्यायालयीन कामकाजातील त्यांची कार्यतत्परता व सेवाभाव सहकाऱ्यांसाठी तसेच नव्याने सेवेत दाखल होणाऱ्या स्टेनोग्राफरसाठी प्रेरणादायी ठरला. अहिल्यानगर स्टेनोग्राफर्स असोसिएशनच्या कार्याध्यक्षपदाची जबाबदारीही त्यांनी यशस्वीपणे सांभाळत संघटनेच्या कार्यात महत्त्वपूर्ण योगदान दिले.

यावेळी गणेश सब्बन म्हणाले, न्यायालयीन सेवेमध्ये काम करताना केवळ आपल्या पदाची जबाबदारी पार पाडणे पुरेसे नसते, तर कामामध्ये अचूकता, वेळेचे नियोजन, गोपनीयता आणि कर्तव्याप्रती प्रामाणिकपणा या गुणांची आवश्यकता असते. पीरजादे नजीरहुसेन यांनी आपल्या प्रदीर्घ सेवाकाळात हे सर्व गुण सातत्याने जपले. त्यामुळे त्यांची सेवा ही केवळ नोकरी न राहता न्यायालयीन व्यवस्थेतील एक जबाबदार योगदान ठरली आहे. पीरजादे यांचे सुपुत्र साकिब पीरजादे हे जिल्हा न्यायालयात स्टेनोग्राफर ग्रेड–२ म्हणून कार्यरत आहेत. तर त्यांचे धाकटे सुपुत्र बी. ए. एलएलबी तृतीय वर्षाचे शिक्षण घेत आहेत. त्यामुळे पीरजादे कुटुंबाचा न्यायसंस्थेशी असलेला जिव्हाळ्याचा आणि आत्मीय संबंध या निमित्ताने अधोरेखित झाला.

या सेवापूर्ती सोहळ्याच्या आयोजनासाठी असोसिएशनचे अध्यक्ष राम बेल्हेकर, उपाध्यक्ष लयचेट्टी, धवळे, कोमल लासुरे, वाव्हळ तसेच असोसिएशनच्या इतर सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# निमगाव वाघात रंगणार ६ सप्टेंबरला ग्रामीण मराठी साहित्याचा जागर



महेश पाटील | माधवराव लामखडे | हेमलता गिते | सीए डॉ. शंकर अंदानी

नगर – स्व. पै. किसनराव डोंगरे बहुउद्देशीय संस्था, श्री नवनाथ युवा मंडळ आणि धर्मवीर ग्रामीण सार्वजनिक वाचनालय यांच्या संयुक्त विद्यमाने शिक्षक दिनानिमित्त निमगाव वाघा (ता. नगर) येथे आठवे ग्रामीण मराठी साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. ६ सप्टेंबर रोजी होणाऱ्या या साहित्य संमेलनाच्या माध्यमातून ग्रामीण भागातील साहित्यिक, कवी, लेखक, विचारवंत आणि साहित्यप्रेमी एकवटणार आहे.

या साहित्य संमेलनाचे उद्‌घाटन शहर वाहतूक नियंत्रण शाखेचे पोलीस निरीक्षक महेश पाटील यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून माजी जिल्हा परिषद सदस्य माधवराव लामखडे उपस्थित राहणार आहेत. त्यांच्या हस्ते सामाजिक, साहित्य, आरोग्य, शैक्षणिक, कला, क्रीडा, उद्योग आणि पर्यावरण अशा विविध क्षेत्रांत उल्लेखनीय व कर्तृत्ववान कार्य करणाऱ्या व्यक्तींना पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे. संमेलनाच्या स्वागताध्यक्षपदी कवयित्री हेमलता गिते उपस्थित राहणार असून, साहित्यिक सीए डॉ. शंकर अंदानी हे संमेलनाच्या अध्यक्षपदाची धुरा सांभाळणार असल्याची माहिती संयोजन समितीचे प्रमुख नाना डोंगरे यांनी दिली.

६ सप्टेंबर रोजी गावातून ग्रंथ दिंडी काढून संमेलनाची सुरुवात होणार आहे. या ग्रंथ दिंडीत साहित्यिक, कवी, लेखक तसेच साहित्यप्रेमी सहभागी होणार आहेत. ग्रंथ दिंडीच्या माध्यमातून गावकऱ्यांमध्ये वाचन, साहित्य आणि पुस्तकांविषयीची आवड निर्माण करण्याचा संदेश दिला जाणार आहे. ग्रंथ दिंडीनंतर परिवार मंगल कार्यालयात मान्यवरांच्या उपस्थितीत साहित्य संमेलनाचे औपचारिक उद्‌घाटन होणार आहे. त्यानंतर दिवसभर विविध साहित्यिक व सांस्कृतिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

संमेलनामध्ये ज्येष्ठ साहित्यिक, विचारवंत आणि मान्यवरांचे परिसंवाद तसेच व्याख्याने आयोजित करण्यात आली आहेत. बदलत्या सामाजिक परिस्थितीत साहित्याची भूमिका, ग्रामीण जीवनाचे साहित्यामधील प्रतिबिंब, वाचन संस्कृतीचे महत्त्व, नव्या पिढीसमोरील आव्हाने आणि साहित्याच्या माध्यमातून सामाजिक परिवर्तन अशा विविध विषयांवर मान्यवरांकडून विचारमंथन होणार आहे.

या साहित्य संमेलनाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्तींचा मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार देऊन गौरव करण्यात येणार आहे. सामाजिक कार्य, साहित्यनिर्मिती, आरोग्यसेवा, शिक्षण, कला, क्रीडा, उद्योग आणि पर्यावरण संवर्धन आदी क्षेत्रांमध्ये योगदान देणाऱ्या कर्तृत्ववान व्यक्तींची दखल या माध्यमातून घेतली जाणार आहे.

पंचक्रोशीतील साहित्यिक, कवी, विद्यार्थी, शिक्षक, वाचक आणि साहित्यप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून संमेलनात सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# मुख्याध्यापिका मीना पवार यांचा आदर्श शिक्षिका पुरस्काराने गौरव



आमदार सत्यजित तांबे यांच्या हस्ते मीना पवार यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला.

नगर – शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी योगदान देणाऱ्या मीना पवार यांना राज्यस्तरीय आदर्श शिक्षिका पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. जन आरोग्यम, जाणीव फाउंडेशन संगमनेर, संचार निगम पेन्शनर्स वेलफेअर असोसिएशन आणि अमृत उद्योग समूह यांच्या वतीने हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

नाशिक पदवीधर मतदारसंघाचे आ. सत्यजित तांबे यांच्या हस्ते मीना पवार यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला. खांडगाव येथे आयोजित करण्यात आलेल्या पुरस्कार सोहळ्यात विविध मान्यवरांच्या उपस्थितीत हा गौरव करण्यात आला. मीना पवार यांनी शैक्षणिक क्षेत्रात केलेले उल्लेखनीय कार्य, विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेसोबतच त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी राबविलेले विविध उपक्रम तसेच सामाजिक बांधिलकी जपत केलेल्या कार्याची दखल घेत त्यांना या राज्यस्तरीय पुरस्काराने गौरविण्यात आले. त्या अहमदनगर एज्युकेशन सोसायटी प्राथमिक शाळा वाबोरी येथे मुख्याध्यापिका म्हणून कार्यरत आहेत.

या पुरस्कारामुळे त्यांच्या कार्याचा सन्मान तर झालाच, शिवाय शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. त्यांच्या या यशाबद्दल शिक्षकवृंद, विद्यार्थी, पालक, शाळा व्यवस्थापन तसेच ग्रामस्थांच्या वतीने त्यांचे अभिनंदन करण्यात आले आहे.



दुर्गम भागात वसलेल्या रूपलातांडा (ता. पाथर्डी) शाळेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान करताना मनपा उपायुक्त मेहेर लहारे.

# मनपा उपायुक्त मेहेर लहारे यांनी केले शाळेच्या उपक्रमांचे कौतुक

नगर – डोंगराच्या कुशीत, दुर्गम भागात वसलेल्या तांड्यावरील शाळेतही गुणवत्तापूर्ण आणि दर्जेदार शिक्षणाची प्रभावी वाटचाल सुरू असून, विद्यार्थ्यांच्या कलागुणांना योग्य व्यासपीठ मिळत असल्याचे चित्र जि.प. प्राथमिक शाळा रूपलातांडा येथे पाहायला मिळाले.

अहिल्यानगर महापालिकेचे उपायुक्त मेहेर लहारे यांनी नुकतीच सहकुटुंब शाळेला भेट देऊन विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता, विविध नाविन्यपूर्ण उपक्रम आणि शाळेचे शैक्षणिक वातावरण यांची पाहणी केली. शाळेतील विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येणारे विविध उपक्रम पाहून प्रभावित झालेल्या उपायुक्त श्री. लहारे यांनी सर्व विद्यार्थ्यांना शालोपयोगी वस्तूंचे वाटप केले. महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ, मुंबई यांच्या वतीने आयोजित राज्यस्तरीय बालचित्रकला स्पर्धेत या शाळेतील पाच विद्यार्थ्यांनी तालुकास्तरावर यश संपादन केले. यामध्ये पवन अभिमन्यु चितळे, आहिल फिरोज पठाण, आफताब अमजद पठाण, माया संभाजी भवरे आणि पूर्वी मच्छिंद्र राठोड यांचा समावेश आहे. त्यांचा उपायुक्त लहारे यांच्या हस्ते सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.

यावेळी मूर्तिकार प्रल्हाद चितळे, धनगरवाडीचे उपसरपंच किशोर राठोड, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष मच्छिंद्र राठोड यांच्यासह बबन राठोड, राजू राठोड, कांतीलाल राठोड, म्हसू राठोड उपस्थित होते.

कार्यक्रमाचे नियोजन शाळेचे मुख्याध्यापक जयराम सातपुते व उपाध्यापिका श्रीमती दीपा मव्हारे यांनी केले.

# मखदुम सोसायटीतर्फे परमवीर चक्र शहीदांच्या चित्र प्रदर्शनातून देशभक्ती, वीर जवानांचा इतिहास समाजासमोर मांडण्याचा प्रयत्न



रहमत सुलतान हॉल येथे आयोजित वीर जवानांच्या चित्र प्रदर्शनात जवानांच्या शौर्याची माहिती देण्यात येत आहे.

नगर – भारतीय सैन्यातील सर्वोच्च शौर्य पुरस्कार असलेल्या परमवीर चक्राने १९४७ ते १९९९ या कालावधीत २१ शूरवीरांना सन्मानित करण्यात आले आहे. या २१ परमवीर चक्र विजेत्या शहीद जवानांची वॉटर कलरमधील आकर्षक पोट्रेट चित्रे वृषाल एकबोटे यांनी साकारली आहेत. मखदुम सोसायटीतर्फे या चित्रांचे प्रदर्शन भरुन देशभक्ती, वीर जवानांचा इतिहास समाजासमोर मांडून जनजागृतीचा अनोखा प्रयत्न होत आहे.

भारतीय सैन्यातील परमवीर चक्र हा देशाचा सर्वोच्च शौर्य पुरस्कार आहे. रणांगणावर असामान्य धैर्य, अदम्य शौर्य आणि सर्वोच्च त्याग दाखविणाऱ्या वीर जवानांना हा सन्मान दिला जातो. आतापर्यंत २१ वीर जवानांना परमवीर चक्राने गौरविण्यात आले आहे. या वीरांनी आपल्या कुटुंबाचा सुखाचा आणि स्वतः च्या जीवाचा विचार न करता मातृभूमीच्या रक्षणाला सर्वोच्च प्राधान्य दिले. त्यांच्या बलिदानामुळे आज आपण सुरक्षित वातावरणात स्वातंत्र्याचा श्वास घेत आहोत. अशा शूरवीरांच्या त्यागाची आणि शौर्याची माहिती नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने मखदुम एज्युकेशन अँड वेल्फेअर सोसायटीच्या वतीने परमवीर चक्र शहीद जवानांच्या चित्रांचे विशेष प्रदर्शन व संगीतमय देशभक्तीपर कार्यक्रमाचे आयोजन रहमत सुलतान हॉल येथे करण्यात आले. या प्रदर्शनाच्या माध्यमातून उपस्थितांना या शूरवीरांच्या शौर्याची, त्यागाची आणि देशसेवेची माहिती मिळाली. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून धुळे येथील सामाजिक कार्यकर्ते अनीसुर्रहेमान अन्सारी, प्रख्यात शायरा डॉ. कमर सुरुर, संध्याताई मेढे, युनुसभाई तांबटकर, चित्रकार वृषाल एकबोटे, आबीद दुलेखान आदी उपस्थित होते.

आज या शूरवीरांची चित्रे आणि त्यांच्या विषयीची माहिती समाजासमोर मांडण्याचे काम मखदुम सोसायटीतर्फे होत आहे, ही अत्यंत कौतुकास्पद बाब आहे. अशा प्रदर्शनांमुळे तरुण पिढीला आपल्या सैनिकांचा इतिहास, त्यांचे शौर्य आणि त्याग समजतो. देशभक्ती ही केवळ घोषणा देण्यात नाही, तर देशासाठी जबाबदारीने काम करण्यात आहे, हा संदेश या वीरांच्या जीवनातून आपल्याला मिळतो, असे प्रतिपादन धुळे येथील सामाजिक कार्यकर्ते अनीसुर्रहेमान अन्सारी यांनी केले.

याप्रसंगी वृषाल एकबोटे यांनी परमवीर चक्राने सन्मानित झालेल्या शहीद जवानांच्या जीवनकार्याची, त्यांच्या शौर्याची आणि देशासाठी दिलेल्या बलिदानाची सखोल माहिती उपस्थितांना दिली. संगीतमय देशभक्तीपर कार्यक्रमातूनही देशप्रेमाची भावना जागृत करण्यात आली.

सूत्रसंचालन शफकत सय्यद यांनी केले. प्रस्ताविक आबीद दुलेखान यांनी केले. आभार डॉ. शमा फारुकी यांनी मानले.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, २७२३, गंजबाजार, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# जनतेचे प्रश्न सोडवून भाजप महिला मोर्चाची ताकद वाढवा

**वैशाली चव्हाण यांचे प्रतिपादन; भाजप महिला पदाधिकाऱ्यांच्या आढावा बैठकीत मार्गदर्शन**



भाजप पक्ष कार्यालयात महिला पदाधिकारी बैठकीप्रसंगी वैशाली चव्हाण यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी प्रिया जानवे, कल्याणी ठुबे, ज्योत्स्ना मुंगी, सुरेखा जंगम आदी महिला पदाधिकारी उपस्थित होत्या.

नगर – महाराष्ट्र सरकारच्या माध्यमातून गोरगरीब, कष्टकरी, शेतकरी, महिला तसेच समाजातील तळागाळातील घटकांसाठी विविध कल्याणकारी योजना राबविण्यात येत आहेत. या योजनांची माहिती सामान्य जनतेपर्यंत पोहोचवून त्यांना प्रत्यक्ष लाभ मिळवून देण्याचे काम महिला कार्यकर्त्यांनी हाती घ्यावे. त्याचबरोबर जनतेच्या प्रश्नांची सोडवणूक करून पक्ष संघटना अधिक मजबूत करण्यासाठी सातत्याने जनसंपर्क ठेवावा, असे आवाहन भारतीय जनता पार्टी महिला मोर्चाच्या प्रदेश सचिव तथा अहिल्यानगर जिल्हा प्रभारी वैशाली चव्हाण यांनी केले.

भारतीय जनता पार्टी महाराष्ट्र प्रदेश महिला मोर्चाच्या अध्यक्षा चित्राताई वाघ यांच्या मार्गदर्शना खाली अहिल्यानगर येथील भारतीय जनता पार्टीच्या कार्यालयात महिला पदाधिकारी व कार्यकर्त्यांची आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. बैठकीच्या अध्यक्षस्थानी जिल्हाध्यक्ष प्रिया जानवे होत्या. यावेळी सावेडी मंडल, केडगाव मंडल सरचिटणीस कल्याणी ठुबे, भिंगार मंडल अध्यक्षा ज्योत्स्ना मुंगी तसेच मध्य मंडल अध्यक्षा सुरेखा जंगम या चारही मंडल प्रमुखांसह महिला पदाधिकारी, कार्यकर्त्या उपस्थित होत्या.

वैशाली चव्हाण म्हणाल्या, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील राज्य सरकारने समाजातील विविध घटकांसाठी अनेक कल्याण कारी योजना सुरू केल्या आहेत. लाडकी बहीण योजना, महिलांना एसटी प्रवासात सवलत, उज्ज्वला योजना, लेक लाडकी योजना, मुद्रांक शुल्कात सवलत, महिला सन्मान योजना, उमेद अभियान, पुण्यश्लोक अहिल्यादेवी स्टार्टअप योजना तसेच महिला शेतकरी सक्षमीकरण अशा विविध योजनांचा लाभ गरजूंपर्यंत पोहोचणे आवश्यक आहे. या योजना केवळ कागदावर न राहता त्यांचा प्रत्यक्ष लाभ सामान्य नागरिकांना मिळवून देण्याची जबाबदारी प्रत्येक महिला कार्यकर्त्याने स्वीकारावी, अशी सूचनाही त्यांनी केली.

प्रारंभी स्वाती सिरसुल यांनी जिल्हा प्रभारी वैशाली चव्हाण यांचा परिचय करून दिला. श्रीरामपूर येथील सामान्य कुटुंबातून आलेल्या वैशाली चव्हाण यांनी गेल्या १५ ते २० वर्षांपासून भारतीय जनता पार्टीसाठी तन–मन–धनाने काम केले आहे. पक्षनिष्ठा, कामाचा दांडगा अनुभव आणि सामान्य जनतेशी असलेली नाळ लक्षात घेऊन पक्षश्रेष्ठींनी त्यांची महाराष्ट्र प्रदेश महिला मोर्चाच्या सचिवपदी तसेच अहिल्यानगर जिल्हा प्रभारी म्हणून नियुक्ती केली असल्याचे स्वाती सिरसुल यांनी सांगितले.

यावेळी उपाध्यक्ष स्वाती पवळे, उपाध्यक्षा नीता गायकवाड, सरचिटणीस ज्योती दांडगे, संध्या पावसे, सुजाता औटी, प्रज्ञा जोशी, प्रतीक्षा रसाळ, पल्लवी जाधव, रेखा मैड, उज्वला भांगे, पूजा आहेर, नीता गायकवाड, सुनंदा गंजी, राखी आहेर आदी पदाधिकारी आणि कार्यकर्त्या उपस्थित होत्या. बैठकीनंतर भाजपा ओबीसी महिला मोर्चाच्या शहर जिल्हाध्यक्षा स्वाती सिरसुल यांच्या जनसंपर्क कार्यालयास वैशाली चव्हाण यांनी सदिच्छा भेट दिली. यावेळी शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला.

# रोटरी क्लब ऑफ अहिल्यानगर सेंट्रलतर्फे रिमांड होममध्ये रक्षाबंधन उत्साहात साजरे



रमांड होममधील मुला–मुलींनी रोटरी सदस्यांना राखी बांधून रक्षाबंधन साजरे केले. यावेळी अमर गुरप, सुनील मुथा व अन्य पदाधिकारी उपस्थित होते.

नगर – रोटरी क्लब ऑफ अहिल्यानगर सेंट्रलतर्फे डिस्ट्रिक्ट प्रोबेशन अँण्ड आफ्टर केअर असोसिएशन संचलित मुला – मुलींचे निरीक्षण गृह व बालगृह येथे रक्षाबंधनाचा कार्यक्रम उत्साहात साजरा करण्यात आला.

यावेळी बालगृहातील मुलींनी रोटरिअन्सना तसेच रिमांड होममधील मुलांना राख्या बांधून रक्षाबंधनाचा आनंद द्विगुणित केला. मुलींना राख्या, मेहंदी कोन व शृंगार साहित्य तर मुलांना खेळणी, मिठाई व फुगे वाटप करण्यात आले. तसेच ८ आयटीआय विद्यार्थ्यांना ६५०० रुपयांची स्टेशनरी, शेंगदाणे व बालशिशूंसाठी दूध पावडर डबे प्रत्येकी १ किलो देण्यात आली. रोटरी क्लबतर्फे हा सेवाभावी उपक्रम गेल्या ३८ वर्षांपासून सातत्याने राबविला जात असून, संस्थेच्या गरजेनुसार विविध प्रकारचे सहाय्य केले जाते. यावेळी क्लब अध्यक्ष रो. अमर गुरप यांनी सर्व मुला–मुलींना रक्षाबंधनाच्या शुभेच्छा दिल्या. तसेच रोटरीच्या सात फोकस एरियांची शिक्षण, आरोग्य, शांतता, महिला सक्षमीकरण, पर्यावरण, सामाजिक विकास आणि पाणी व स्वच्छतेची माहिती विद्यार्थ्यांना दिली.

या प्रसंगी स्नेहा गुरप, सचिव रो. सुनील मुथा, आयपीपी रो. सुनील कटारिया, सुजाता कटारिया, विनोद बोरा, विजय जुन्द्रे, निवृत्ती झिने, मनोज चांदेडिया व त्यांच्या मातोश्री, उमेश रेखे, अमृत कटारिया, निलेश मेहेर, डॉ. कुणाल कोल्हे, ज्ञानेश्वर दुधाडे, प्रभाकर बोगा तसेच संस्थेच्या अधीक्षक माने, शिक्षकवर्ग स्टाफ व विद्यार्थी उपस्थित होते.

रोटरी सदस्य आणि बालगृहातील मुला– मुलींच्या उत्स्फूर्त सहभागामुळे रक्षाबंधनाचा हा कार्यक्रम आनंदी व भावनिक वातावरणात साजरा झाला.



तपोवन रोडवरील मतिमंद मुलांच्या शाळेत मुलांसाठी विविध जीवनावश्यक वस्तूचे व खाऊचे वाटप करण्यात आले.

# तपोवन रोडवरील मतिमंद मुलांच्या शाळेत जीवनावश्यक वस्तूचे आणि खाऊचे वाटप

नगर – ईद ए मिलादच्या निमित्ताने मुकुंदनगरचे माजी नगरसेवक शेख मुदस्सर अहमद इसहाक यांच्या संकल्पनेतून व मित्र मंडळाच्या वतीने तपोवन रोड परिसरातील मतिमंद मुलांच्या शाळेत मुलांसाठी विविध जीवनावश्यक वस्तूचे व खाऊचे वाटप करुन हिंदू–मुस्लिम बांधवांनी एकत्र येत विशेष मुलांसोबत ईद मिलाद साजरी केली.

समाजाच्या मुख्य प्रवाहातील प्रत्येक घटकाला प्रेम, आपुलकी आणि सन्मान मिळावा, या उद्देशाने हा कार्यक्रम राबविण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप करण्यात आले. तसेच त्यांच्या दैनंदिन जीवनात उपयोगी पडणाऱ्या विविध जीवनावश्यक वस्तू भेट म्हणून देण्यात आल्या. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलला. मोहम्मद पैगंबर यांच्या प्रेम, दया, माणुसकी, बंधुभाव व सर्वांना सोबत घेऊन चालण्याच्या विचारांचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला. हिंदू–मुस्लिम ऐक्य, सामाजिक सलोखा आणि मानवतेची भावना अधिक दृढ व्हावी, हा उपक्रमामागील मुख्य उद्देश होता. विशेष मुलांसोबत ईद साजरी करण्याचा हा उपक्रम सामाजिक बांधिलकी व माणुसकीचे प्रेरणादायी उदाहरण ठरला. समाजातील दुर्लक्षित घटकांसोबत सणाचा आनंद वाटून घेतल्याबद्दल उपस्थितांनी शेख मुदस्सर अहमद इसहाक व मित्र मंडळाच्या उपक्रमाचे कौतुक केले. कार्यक्रमास माजी नगरसेवक शेख मुदस्सर अहमद इसहाक, महेश तोरमल, डॉ. अनस सय्यद, जवाद शेख, फारुख शेख, आतिफ शेख, आदिल शेख, शाहरुख शेख, सबिल सय्यद, साहिल सय्यद उपस्थित होते.

# अहमदनगर शहर सहकारी बँकेत सभासदांना सहकाराची सात तत्त्वे, सभासदांची भूमिका व अधिकारांवर मार्गदर्शन



शहर बँकेच्या प्रशिक्षण वर्गाचे उद्घाटन करताना सीए. गिरीश घैसास. समवेत प्रा. माणिकराव विधाते, जयंत काकतकर, अशोक कानडे, रेश्माताई आठरे, निखिल नहार, प्रदीपकुमार जाधव.

नगर – येथील अहमदनगर शहर सहकारी बँक लिमिटेड यांच्या वतीने सभासदांसाठी नुकतेच सभासद प्रशिक्षण वर्ग घेण्यात आला. प्रा. मुकुंद घैसास सभागृहात सहकारी बँकेच्या सभासदांची भूमिका व जबाबदारी या विषयावर प्रशिक्षण सत्रात पुण्यातील तज्ञ व्याख्याते जयंत काकतकर यांनी सभासदांना मार्गदर्शन केले.

प्रशिक्षण वर्गाचे उद्घाटन बँकेचे चेअरमन सीए. गिरीश घैसास, व्हाईस चेअरमन प्रा. माणिकराव विधाते, व्याख्याते जयंत काकतकर, संचालक अशोक कानडे, संचालिका रेश्माताई आठरे, संचालक निखिल नहार, संचालक प्रदीपकुमार जाधव यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आले. यावेळी चेअरमन सीए. गिरीश घैसास यांच्या हस्ते प्रशिक्षणाचे व्याख्याते जयंत काकतकर यांचा सन्मान करण्यात आला.

कुठल्याही संस्थेच्या प्रगतीमध्ये त्या संस्थेच्या सभासदांचा सक्रिय सहभाग असणे आवश्यक असते. सभासद हा केवळ संस्थेच्या नफ्यातील भागीदार नसून, तो संस्थेचा मार्गदर्शक म्हणूनही काम करू शकतो, असे काकतकर यांनी यावेळी सांगितले.

बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी दिनेश लोखंडे यांनी उपस्थितांचे स्वागत व प्रास्ताविक केले. बँकेचे चेअरमन सीए. गिरीश घैसास यांनी आपल्या मनोगतात संचालकांच्या दहा वर्षांच्या कार्यकाळासंदर्भात माध्यम ांमध्ये सुरू असलेली चर्चा आणि प्रत्यक्ष वस्तुस्थिती याबाबत सभासदांना थोडक्यात माहिती दिली. पुण्यातील जनता सहकारी बँकेचे सेवानिवृत्त मुख्य कार्यकारी अधिकारी जयंत काकतकर यांनी आपल्या ओघवत्या व सोप्या शैलीत उपस्थित सभासदांना मार्गदर्शन केले. प्रशिक्षणादरम्यान त्यांनी सहकाराची सात तत्त्वे उदाहरणांसह समजावून सांगितली.

शहर बँकेचे ज्येष्ठ सभासद बी. एम. बांदल आणि बबनराव झावरे यांनी प्रशिक्षण वर्गातील विषयाला अनुसरून विविध शंका उपस्थित केल्या. व्याख्याते जयंत काकतकर यांनी त्यांच्या शंकांचे निरसन केले. प्रशिक्षण वर्गाला महेंद्र नांदुरकर, दशरथ गुंड, सीए. घनश्याम सोळंकी, प्रकाश कुलकर्णी, अतुल खिस्ती, शरद शिंदे, शिरीश कुलकर्णी, हिरालाल कासवा उपस्थित होते. बँकेचे व्हाईस चेअरमन प्रा. माणिकराव विधाते यांनी आभार मानले.

यावेळी बँकेचे सेवक प्रतिनिधी राजेंद्र गायकवाड, वरिष्ठ अधिकारी संजय मुळे, प्रकाश वैरागर, भाऊसाहेब विधाते तसेच बँकेचे इतर अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# हजारो मावळ्यांनी केले किल्ले राजगडावर श्रमदान

**दुर्गसंवर्धनासाठी खा.नीलेश लंके यांच्या नेतृत्वाखाली 'आपला मावळा'ची मोहीम**



किल्ले राजगड येथे स्वच्छता मोहीम राबविताना खा. नीलेश लंके व आपला मावळा संघटनेचे सदस्य.

नगर – छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनात आणि स्वराज्याच्या इतिहासात अनन्यसाधारण महत्त्व असलेल्या किल्ले राजगडावर खा. नीलेश लंके यांच्या नेतृत्वाखाली 'आपला मावळा' संघटनेच्या माध्यमातून ३० ऑगस्ट रोजी दुर्गसंवर्धन व स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. 'आपला मावळा' संघटनेची ही १७ वी दुर्गसंवर्धन मोहीम असून, या उपक्रमात हजारो स्वयंसेवकांनी उत्स्फूर्त सहभाग घेत राजगडाच्या संवर्धनासाठी श्रमदान केले.

भल्या पहाटेच खा. नीलेश लंके यांच्यासह 'आपला मावळा'चे शेकडो स्वयंसेवक राजगडाच्या पायथ्याशी दाखल झाले. इतिहासाचा अमूल्य वारसा जपण्याचा संकल्प करत स्वयंसेवकांनी गडावर विविध ठिकाणी स्वच्छता व संवर्धनाची कामे हाती घेतली. मोहिमेदरम्यान गडावरील कचरा संकलन, परिसराची स्वच्छता, आवश्यक ठिकाणी डागडुजी, दगड–दुरुस्ती तसेच नामफलक लावण्यासह दुर्गसंवर्धनाचे विविध उपक्रम राबविण्यात आले. हजारो हातांनी केलेल्या श्रमदानामुळे गडाचा परिसर स्वच्छ करण्यास मोठी मदत झाली.

यावेळी खा. लंके यांनी राजगडाच्या ऐतिहासिक महत्त्वावर प्रकाश टाकला. छत्रपती शिवाजी महाराजांच्या इतिहासात राजगडाला अत्यंत विशेष स्थान असून, तब्बल २६ वर्षे हा किल्ला मराठा साम्राज्याची राजधानी होता. महाराजांच्या कारकिर्दीतील अनेक महत्त्वपूर्ण घडामोडींचा राजगड साक्षीदार राहिला आहे. त्यामुळे राजगड हा केवळ एक ऐतिहासिक किल्ला नसून स्वराज्याच्या गौरवशाली इतिहासाचा अत्यंत महत्त्वाचा ठेवा असल्याचे लंके यांनी सांगितले. मात्र, एवढे मोठे ऐतिहासिक आणि पर्यटनदृष्ट्या महत्त्व असलेल्या राजगडावर येणाऱ्या पर्यटक व शिवप्रेमींसाठी आवश्यक मूलभूत सुविधांचा अभाव असल्याबद्दल त्यांनी नाराजी व्यक्त केली. गडावर जाण्यासाठी पुरेसा व सुस्थितीतील रस्ता उपलब्ध नसल्याने पर्यटकांना अडचणींचा सामना करावा लागतो. विशेषतः महिलांसाठी आवश्यक शौचालयांची सुविधा नसल्याचे तसेच इतर मूलभूत सुविधाही अपुऱ्या असल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले.

गड–किल्ल्यांचे जतन आणि संवर्धन करणे ही सर्वांची सामूहिक जबाबदारी असली, तरी या ऐतिहासिक ठिकाणी भेट देणाऱ्या पर्यटकांना आवश्यक सुविधा उपलब्ध करून देणेही तितकेच महत्त्वाचे असल्याचे लंके यांनी स्पष्ट केले. राजगडाच्या सर्वांगीण विकासासाठी शासन दरबारी सातत्याने पाठपुरावा करून आवश्यक सुविधा उपलब्ध करण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील, अशी ग्वाही त्यांनी दिली.

'आपला मावळा' संघटनेच्या माध्यमातून यापूर्वीही महाराष्ट्रातील विविध गड–किल्ल्यांवर दुर्गसंवर्धन, स्वच्छता आणि ऐतिहासिक वारसा जतनाच्या मोहिमा राबविण्यात आल्या आहेत. राजगडावरील १७ व्या मोहिमेत तब्बल हजार स्वयंसेवकांनी सहभाग घेत स्वराज्याच्या इतिहासाचा हा अनमोल वारसा जपण्यासाठी श्रमदान केले. या मोहिमेतून तरुणांमध्ये गड–किल्ल्यांविषयी जाणीव, इतिहासाविषयी अभिमान आणि वारसा संवर्धनाची भावना अधिक दृढ होईल, असा विश्वासही यावेळी व्यक्त करण्यात आला.

# एसटी कर्मचाऱ्यांसोबत शिवसेना महिला पदाधिकाऱ्यांनी साजरा केला रक्षाबंधनाचा सण



शिवसेना शिंदे गटाच्या महिला पदाधिकाऱ्यांनी एसटी अधिकारी व कर्मचाऱ्यांना राख्या बांधून रक्षाबंधनाचा सण साजरा केला.

नगर – रक्षाबंधन हा भाऊ–बहिणीच्या प्रेमाचा, विश्वासाचा आणि सामाजिक बंधुभावाचा सण आहे. याच भावनेतून शिवसेना शिंदे गटाच्या महिला पदाधिकाऱ्यांनी तारकपूर बसस्थानकातील एसटी अधिकारी व कर्मचाऱ्यांसोबत रक्षाबंधनाचा सण अनोख्या पद्धतीने साजरा केला. महिला पदाधिकाऱ्यांनी एसटी कर्मचाऱ्यांना राखी बांधून त्यांच्या सेवाभावी कार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

एसटी महामंडळाचे कर्मचारी दररोज आपल्या कर्तव्यावर तत्पर राहून हजारो प्रवाशांना त्यांच्या इच्छित स्थळी पोहोचविण्याचे काम करतात. उन्हाळा, पावसाळा असो अथवा विविध सण–उत्सवांचा काळ, प्रवाशांची वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी एसटी कर्मचारी आपले कर्तव्य बजावत असतात. त्यांच्या या कार्याची दखल घेत शिवसेना महिला पदाधिकाऱ्यांनी रक्षाबंधनाच्या निमित्ताने एसटी कर्मचाऱ्यांसोबत हा उपक्रम राबविला. यावेळी महिला पदाधिकाऱ्यांनी एसटी कर्मचाऱ्यांच्या हातावर राखी बांधली. रक्षाबंधनाच्या माध्यमातून केवळ भाऊ–बहिणीचे नाते दृढ होत नाही, तर समाजातील विविध घटकांमध्ये आपुलकी, विश्वास आणि बंधुभाव निर्माण होतो, हा संदेश या उपक्रमातून देण्यात आला. महिला पदाधिकाऱ्यांनी एसटी कर्मचाऱ्यांना रक्षाबंधनाच्या शुभेच्छा देत त्यांच्या कार्याचे कौतुक केले.

या उपक्रमात शिवसेना जिल्हा महिला संघटक ॲड. पुष्पा येळवंडे, अल्पसंख्याक महिला शहराध्यक्ष नीता बर्वे, शहर संघटक सलोनी शिंदे, उपशहर प्रमुख तृप्ती साळवे, सचिव सुनिता बहुले यांच्यासह महिला पदाधिकारी सहभागी झाल्या होत्या. तारकपूर बसस्थानकाचे डेपो मॅनेजर अभिजीत चौधरी यांच्यासह किरण शिंदे, ऋषिकेश सोनवणे, विद्याधर साठे, सुरेश कासार, आदिनाथ गाढे तसेच एसटीचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# क्रिकेट प्रशिक्षक दिनेश लाड यांचा इंडियन आयकॉन अॅवॉर्डने सन्मान



क्रिकेट प्रशिक्षक दिनेश लाड यांना विनर्स बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डचे संस्थापक अध्यक्ष डॉ. दीपक हरके यांच्या हस्ते इंडियन आयकॉन अवॉर्ड देऊन सन्मानित करण्यात आले.

मुंबई – द्रोणाचार्य पुरस्कार विजेते क्रिकेट प्रशिक्षक दिनेश लाड यांना विनर्स बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डचे संस्थापक अध्यक्ष व १८४ वर्ल्ड रेकॉर्ड करणारे पहिले भारतीय डॉ. दीपक हरके यांच्या हस्ते इंडियन आयकॉन अवॉर्ड देऊन सन्मानित करण्यात आले आहे.

भारतीय क्रिकेटमधील अमूल्य योगदानाबद्दल आणि अनेक जागतिक दर्जाचे खेळाडू घडवल्याबद्दल त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे. हा पुरस्कार अशा असामान्य व्यक्तींना दिला जातो ज्यांनी आपल्या कार्यातून समाजात आणि संबंधित क्षेत्रात सकारात्मक बदल घडवून आणला आहे.

दिनेश लाड हे भारतीय क्रिकेट जगतातील अत्यंत प्रतिष्ठित नाव आहे. त्यांनी मुंबईतून अनेक जागतिक स्तरावरील क्रिकेटपटू शोधले आणि त्यांना योग्य मार्गदर्शन करून घडवले. भारतीय क्रिकेट संघाचा माजी कर्णधार रोहित शर्मा आणि अष्टपैलू खेळाडू शार्दुल ठाकूर हे दिनेश लाड यांचेच शिष्य आहेत. खेळाडू घडवण्यातील त्यांच्या याच अतुलनीय योगदानासाठी त्यांना भारत सरकार तर्फे द्रोणाचार्य पुरस्काराने देखील गौरविण्यात आले आहे. मिस इंडिया आणि विनर्स बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड्सच्या चेअरमन डॉ. ईशा अग्रवाल यांनीही दिनेश लाड यांचे अभिनंदन केले.

# जिल्ह्यातील जातीयवादी प्रवृत्ती थोपविण्यासाठी व्यापक चळवळीसाठी प्रयत्न करणार

**राजेंद्र गवई यांचे प्रतिपादन; आरपीआयच्या संवाद बैठकीत गवई यांनी कार्यकर्त्यांशी साधला संवाद**



रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांची संवाद बैठकीसाठी नगरमध्ये आलेले राष्ट्रीय सरचिटणीस राजेंद्र गवई यांचे स्वागत करताना जिल्ह्यातील पदाधिकारी.

नगर – जिल्ह्यातील जातीयवादी प्रवृत्ती थोपविण्यासाठी महाविकास आघाडीच्या वरिष्ठ नेत्यांशी चर्चा करून व्यापक चळवळीसाठी प्रयत्न केले जाणार असल्याचे प्रतिपादन रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे राष्ट्रीय सरचिटणीस राजेंद्र गवई यांनी केले. शहरासह जिल्ह्यात समाजात अशांतता पसरविण्यासाठी सुरू असलेल्या जातीयवादी प्रवृत्तीचा त्यांनी निषेध नोंदविला.

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांची संवाद बैठक ३० ऑगस्ट रोजी शासकीय विश्रामगृह येथे पार पडली. या बैठकीत गवई बोलत होते. यावेळी शहर जिल्हाध्यक्ष सुशांत म्हस्के, दानिश शेख, गुलाम शेख, विजय शिरसाठ, नईम शेख, अजीम खान, सचिन शिंदे, स्वप्नील साठे, शुभम ठोंबे, नजीर देशमुख, लकी वाघमारे, राहुल ठोकळ, प्रकाश थोरात, जमीर सय्यद, जावेद सय्यद, योहान चाबुकस्वार, अजीज शेख, अरबाज शेख, हुसेन चौधरी, सुशील म्हस्के, चिकू गायकवाड, महिला शहर जिल्हाध्यक्षा ज्योती पवार, संपदा म्हस्के, ताई पगारे, मनीषा गायकवाड, कमल वाघमारे, पूजा साठे, वाश्रांति पठारे, रेश्माध जाधव, शितल नाटिकर, रिना पाटोळे, सारिका साळवे, सोनाली बनसोडे आदींसह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

पुढे बोलताना राजेंद्र गवई म्हणाले की, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार घेऊन पक्षाचे काम सुरू आहे. संविधानविरोधी जातीयवादी पक्षांबरोबर न जाता पक्षाच्या विचारधारेने कार्य सुरू आहे. सत्तेची हवा पाहून त्याबरोबर वाहिलो नाही. विचारांवर ठाम राहिल्याने सत्तेबरोबर गेले नाही. आंबेडकरी चळवळीचा विचार पुढे घेऊन काम सुरू आहे. महाराष्ट्रात मागासवर्गीय जातीच्या उपवर्गीकरणाला विरोध दर्शविताना राज्य सरकारने अटी व शर्तींचा भंग केल्याचे त्यांनी सांगितले.

प्रास्ताविक आरपीआयचे शहर जिल्हाध्यक्ष सुशांत म्हस्के यांनी केले. पक्षात प्रवेश केलेल्या कार्यकर्त्यांचे तसेच नूतन पदाधिकाऱ्यांचे गवई यांच्या हस्ते सत्कार करुन अभिनंदन करण्यात आले. संवाद बैठकीत विविध पदांवर नूतन पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली. त्यामध्ये ताई पगारे यांची कोपरगाव तालुका अध्यक्षपदी, महेश भिंगारदिवे यांची नगर तालुका अध्यक्ष (मेहकरी) म्हणून, शारोन क्षेत्रे यांची पाथर्डी उपतालुका अध्यक्षपदी, राजू आरु यांची टाकळी येथील पदावर, आकाश भिंगारदिवे यांची नगर तालुका सचिव (निंबोडी) म्हणून, तर फयाज शेख यांची अल्पसंख्याक जिल्हा उपाध्यक्ष (आलमगीर) म्हणून निवड करण्यात आली.

# अर्थजगत

नेपाळमध्ये झालेल्या एका अपघातानंतर विमा कंपनीचे म्हणणे होते की, अपघात परदेशात झाल्यामुळे विमा पॉलिसी लागू होत नाही आणि नुकसानभरपाई देण्याची त्यांची जबाबदारी नाही. सर्वोच्च न्यायालयाने मोटर इन्शुरन्सशी संबंधित एका महत्त्वाच्या प्रकरणात स्पष्ट केले आहे की, जर कोणत्याही विमा पॉलिसीमध्ये स्पष्टपणे हे लिहिलेले नसेल की भारताबाहेर होणारे अपघात कव्हर केले जाणार नाहीत, तर केवळ या कारणावरून क्लेम फेटाळला जाऊ शकत नाही. न्यायालयाने हेदेखील स्पष्ट केले की, पॉलिसीच्या अटींमध्ये कोणतीही अस्पष्टता असेल, तर त्याचा फायदा विमा कंपनीला मिळू शकत नाही.

## देशाबाहेर अपघात झाला तरी नुकसान भरपाई मिळणार

सर्वोच्च न्यायालयाच्या द्विपक्षीय खंडपिठाने ओरिएंटल इन्शुरन्स कंपनी लिमिटेडची याचिका फेटाळून लावत हा निर्णय दिला. हे प्रकरण सन २०१० चे आहे.

नेपाळमध्ये एका बस अपघातात हरीश यादवसह तीन लोकांचा मृत्यू झाला होता. त्यानंतर मोटर अपघात दावा न्यायाधिकरणने पीडितांच्या कुटुंबीयांना ३२ लक्ष ६७ हजार रुपयांची नुकसानभरपाई देण्याचे आदेश दिले होते. तसेच, २०११ पासून या रकमेवर सहा टक्के वार्षिक व्याज देण्यास सांगितले होते. सुरुवातीला न्यायाधिकरणाने नुकसानभरपाई देण्याची जबाबदारी वाहन मालकावर टाकली होती. मात्र, नंतर छत्तीसगड उच्च न्यायालयाने म्हटले की हे पैसे विमा कंपनीलाच द्यावे लागतील. आता सर्वोच्च न्यायालयानेही उच्च न्यायालयाचा हा निर्णय कायम ठेवला आहे.



ओरिएंटल इन्शुरन्स कंपनी लिमिटेड विरुद्ध दुर्ग रोडवेज प्राइवेट लिमिटेड प्रकरणात विमा कंपनीचे म्हणणे होते की, अपघात नेपाळमध्ये झाला असल्यामुळे विमा पॉलिसी लागू होत नाही. परंतु सर्वोच्च न्यायालयाने हा युक्तिवाद मान्य केला नाही. न्यायालयाने म्हटले की, कंपनीला भारताबाहेर होणारे अपघात पॉलिसीच्या कक्षेतून बाहेर ठेवायचे असतील, तर ती गोष्ट पॉलिसीच्या अटींमध्ये स्पष्ट शब्दांत लिहिली पाहिजे होती. न्यायालयाने असेही सांगितले की, ज्या बसचा अपघात झाला, ती सर्व आवश्यक परवानगी घेऊन आणि नियमांचे पालन करून कायदेशीर मार्गाने नेपाळमध्ये गेली होती. त्यामुळे दुर्घटना देशाबाहेर झाली असे म्हणून क्लेम नाकारता येणार नाही.

सुनावणीदरम्यान सर्वोच्च न्यायालयाने विमा कंपन्यांच्या कार्यपद्धतीवरही कडक टिप्पणी केली. न्यायालयाने म्हटले की, कंपन्या आपल्या पॉलिसीमध्ये काय कव्हर करावे आणि काय नाही, हे ठरवण्याचा अधिकार ठेवतात, परंतु सर्व अटी पूर्णपणे स्पष्ट असल्या पाहिजेत. न्यायालयाने हेदेखील स्पष्ट केले की, जर पॉलिसीच्या अटी नीट लिहिल्या गेल्या नसतील, तर त्याचे नुकसान विमा कंपनीला सहन करावे लागू शकते. विम्याचे करार कंपन्या स्वतः तयार करतात, त्यामुळे त्यांची भाषा अशी असली पाहिजे जी सामान्य ग्राहकाला सहज समजेल.

या निर्णयाचा प्रभाव केवळ मोटार इन्शुरन्सपुरता मर्यादित राहणार नाही, तर आरोग्य, ट्रॅव्हल आणि प्रॉपर्टी इन्शुरन्सशी संबंधित प्रकरणांमध्येही याचा परिणाम दिसून येऊ शकतो. सर्वोच्च न्यायालयाने सुचवले की, इरडाने सर्व मोटर विमा पॉलिसींमध्ये सीमापार संरक्षणाशी संबंधित नियम एकसारखे बनवावेत आणि पॉलिसीच्या सर्व अटी ग्राहकांना सोप्या भाषेत सांगितल्या जाव्यात याची खात्री करावी.

◆◆◆

■ करचना




## छोटीशी चूक, मोठा दंड

**बँक खात्यात पुरेशी शिल्लक नसल्यास तुमची एसआयपी किंवा ऑटो-डेबिट व्यवहार अयशस्वी होऊ शकतो. अशा वेळी बँक ईसीएसआरटीएन (इलेक्ट्रॉनिक क्लिअरिंग सर्व्हिस रिटर्न) शुल्क म्हणून २५० ते ५०० रुपयांपर्यंत दंड आकारू शकते. त्यामुळे म्युच्युअल फंड गुंतवणूकदार आणि कर्जाचा ईएमआय भरणाऱ्या ग्राहकांवर थेट परिणाम होतो. सध्या भारतात ८ कोटींहून अधिक गुंतवणूकदार एसआयपीद्वारे गुंतवणूक करतात, तर कोट्यवधी नागरिक विविध कर्जांचे ईएमआय भरतात.**

जर तुम्ही दर महिन्याला म्युच्युअल फंडात एसआयपीद्वारे गुंतवणूक करत असाल किंवा कोणत्याही कर्जाचा ईएमआय भरत असाल, तर बँक स्टेटमेंटमध्ये ईसीएसआरटीएन असा उल्लेख दिसणे ही चिंतेची बाब ठरू शकते. ईसीएसआरटीएन म्हणजे इलेक्ट्रॉनिक क्लिअरिंग सर्व्हिस रिटर्न. खात्यात पुरेशी रक्कम नसल्यामुळे ऑटो-डेबिट व्यवहार अयशस्वी झाल्यास बँक हा दंड आकारते. हा दंड २५० ते ५०० रुपयांपर्यंत असू शकतो आणि त्यावर १८ टक्के जीएसटी वेगळा आकारला जातो.

तुमच्या पुढील एसआयपीची तारीख जवळ आली असेल, तर वेळेवर बँक खात्यातील शिल्लक तपासणे अत्यंत महत्त्वाचे आहे. ऑटो-डेबिट व्यवहार अयशस्वी झाल्यास बँक आणि म्युच्युअल फंड संस्था स्वतंत्रपणे दंड आकारू शकतात. त्यामुळे दर महिन्याच्या बचतीवर त्याचा परिणाम होऊ शकतो.

**बँक हा दंड का आकारते?**

इलेक्ट्रॉनिक क्लिअरिंग सर्व्हिस (ईसीएस) किंवा नॅशनल ऑटोमेटेड क्लिअरिंग हाऊस (एनएसीएच) या सुविधांद्वारे दर महिन्याला ठरावीक तारखेला तुमच्या बँक खात्यातून एसआयपी, कर्जाचा ईएमआय किंवा विविध बिलांची रक्कम आपोआप वजा केली जाते.

मात्र, व्यवहाराच्या दिवशी खात्यात पुरेशी शिल्लक नसल्यास बँक हा व्यवहार नाकारते. या नाकारलेल्या किंवा अयशस्वी झालेल्या व्यवहारालाच बँकिंग भाषेत ईसीएसआरटीएन (ईसीएस रिटर्न) असे म्हणतात.

प्रत्येक वेळी ऑटो-डेबिट व्यवहार अयशस्वी झाल्यास बँक प्रक्रिया शुल्काच्या नावाखाली दंड आकारते.

उदाहरणार्थ, १,००० ची एसआयपी बाऊन्स झाल्यास तुम्हाला ३०० ते ५०० रुपयांपर्यंत अतिरिक्त आर्थिक फटका बसू शकतो. पूर्वीच्या तुलनेत ही प्रणाली आता अधिक कठोर झाली आहे.

जर तुमच्या एकापेक्षा अधिक एसआयपी किंवा ईएमआय एकाच दिवशी बाऊन्स झाले, तर बँक प्रत्येक व्यवहारासाठी स्वतंत्र ईसीएसआरटीएन शुल्क आकारते. त्यामुळे एका दिवसातच १,००० ते २,००० पर्यंतचा अतिरिक्त खर्च होऊ शकतो.

ऑटो-डेबिट व्यवहार कर्जाच्या किंवा क्रेडिट कार्डच्या ईएमआयशी संबंधित असेल, तर तो अयशस्वी झाल्यास तुमच्या सिबिल (सीआयबीआयएल) गुणांकनावर नकारात्मक परिणाम होऊ शकतो.

सलग ३ महिने एसआयपी बाऊन्स झाल्यास म्युच्युअल फंड कंपन्या तुमची एसआयपी बंद करण्याचा निर्णय घेऊ शकतात.

◆◆◆




## वारंवार युपीआय वापरल्यास नोटीस येते का?

आजच्या डिजिटल युगात आपले जीवन पूर्णपणे बदलले आहे. भाजीवाल्याला २० रुपये देण्यापासून ते कोणालाही लाखो रुपये पाठवण्यापर्यंत आपण प्रत्येक कामासाठी फोनपे, गूगल पे, युपीआय, एनईएफटी, आरटीजीएस किंवा आयएमपीएस यांसारख्या डिजिटल पेमेंट पद्धतींचा मोठ्या प्रमाणात वापर करतो. चिमूटभर वेळात पैसे पाठवणे अत्यंत सोपे झाले आहे. परंतु, याच सुलभतेमुळे लोकांच्या मनात एक भीती देखील निर्माण झाली आहे. वारंवार ऑनलाइन व्यवहार केल्यास किंवा जास्त पैसे पाठवल्यास किंवा मागवल्यास आयकर विभागाची नोटिस येऊ शकते का, असा प्रश्न अनेकांना पडतो.

करतज्ज्ञांचे म्हणणे आहे की, लोकांमध्ये सर्वात मोठा गैरसमज हा आहे की त्यांच्या प्रत्येक लहान-मोठ्या युपीआय व्यवहारावर आयकर अधिकारी थेट नजर ठेवून असतात. पण तसे अजिबात नाही. केवळ डिजिटल माध्यमातून पैसे पाठवल्याने किंवा घेतल्याने आयकर विभागाची नोटिस येत नाही.

आयकर विभाग सामान्य नागरिकाच्या प्रत्येक लहान-मोठ्या व्यवहारावर लक्ष ठेवत नाही. यासाठी एक निश्चित आणि व्यवस्थित यंत्रणा अस्तित्वात आहे. बँक आणि इतर संस्था विशिष्ट नियमांनुसार 'स्टेटमेंट ऑफ फायनान्शियल ट्रान्झॅक्शन्स' सरकारला पाठवतात. जेव्हा एखादा व्यवहार ठरवलेल्या मर्यादेपेक्षा जास्त होतो, तेव्हाच हा अहवाल सादर केला जातो. म्हणजेच आपले व्यवहार सामान्य मर्यादेत असतील, तर घाबरण्याचे कोणतेही कारण नाही.

आयकर विभाग काही विशिष्ट प्रकारच्या मोठ्या व्यवहारांवर आणि पॅटर्नवर बारीक लक्ष ठेवतो.

* तुम्ही आपल्या बचत खात्यात एका आर्थिक वर्षात दहा लाख रुपये किंवा त्याहून अधिक रोख जमा केले, तर बँक याची माहिती आयकर विभागाला देते.
* चालू खात्यामध्ये पन्नास लाख रुपये किंवा त्याहून अधिक रोख जमा केल्यास किंवा काढल्यास त्यावर नजर ठेवली जाते.
* तुम्ही तुमच्या क्रेडिट कार्डचे बिल रोख स्वरूपात एक लाख रुपयांपेक्षा जास्त भरले किंवा कोणत्याही माध्यमातून वर्षभरात एकूण दहा लाख रुपये किंवा त्याहून अधिक पेमेंट केले, तर त्याची नोंद होते.
* दहा लाख रुपये किंवा त्याहून अधिक रकमेची मुदत ठेव, शेअर्स, म्युच्युअल फंड, बाँड किंवा डिबेंचर खरेदी करणे आणि तीस लाख रुपयांपेक्षा जास्त संपत्तीची खरेदी-विक्री थेट एसएफटीच्या कक्षेत येते.

आजआयकर विभाग पूर्वीपेक्षा अधिक प्रगत झाला आहे. 'प्रोजेक्ट इन्साइट'च्या माध्यमातून पूर्णपणे डेटाच्या आधारे काम करतो. कर चोरी रोखण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता आणि मशिन लर्निंगचा मोठ्या प्रमाणावर वापर केला जातो. त्यामुळे पैसे कसे आणि कोठून फिरवले जातात हे समजणे शक्य झाले आहे.

◆◆◆

## तीन वर्षांच्या आत 'नवीन घर' विकले आहे?

जर तुम्ही जुने घर किंवा इतर मालमत्ता विकून आयकर कायद्यातील कलम ५४ किंवा ५४ एफ अंतर्गत भांडवली नफ्यावर करसवलत घेतली असेल आणि त्यानंतर खरेदी केलेले नवीन घर ३ वर्षांच्या आत विकले, तर ही सवलत रद्द होऊ शकते. अशा परिस्थितीत करदात्याला अतिरिक्त कर, व्याज आणि दंडाचा सामना करावा लागू शकतो. त्यामुळे आकलन वर्ष २०२६-२७ साठी आयकर विवरणपत्र दाखल करताना योग्य पद्धतीने कराची गणना करणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

आयकर कायदा, १९६१ मधील कलम ४५ नुसार घर किंवा इतर भांडवली मालमत्ता विक्रीतून मिळणाऱ्या भांडवली नफ्यावर कर आकारला जातो. मात्र, विशिष्ट अटी पूर्ण केल्यास कलम ५४ किंवा कलम ५४ एफ अंतर्गत या करातून सूट मिळू शकते. अनेक करदाते करबचतीसाठी नवीन घर खरेदी करून ही सवलत घेतात; परंतु त्यानंतर आवश्यक असलेला ३ वर्षांचा लॉक-इन कालावधी पूर्ण होण्यापूर्वीच ते घर विकून टाकतात. अशा वेळी आधी मिळालेली करसवलत मागे घेतली जाते.

यामुळे केवळ अतिरिक्त कर भरावा लागतो असे नाही, तर आयकर विवरणपत्रात योग्य माहिती न दिल्यास आयकर विभागाकडून प्रकरणाची छाननी होऊ शकते. त्यातून कराची अतिरिक्त मागणी, व्याज तसेच दंडाची नोटीसही मिळू शकते.

■ **कलम ५४ म्हणजे काय?**

कलम ५४ ही सवलत अशा करदात्यांसाठी आहे, ज्यांनी निवासी घर विकले असून त्यातून झालेल्या दीर्घकालीन भांडवली नफ्याची रक्कम ठरावीक कालावधीत दुसऱ्या निवासी घराच्या खरेदी किंवा बांधकामासाठी वापरली आहे. अशा वेळी पात्रतेनुसार भांडवली नफ्यावर करसवलत मिळते.

■ **कलम ५४ एफ म्हणजे काय?**

कलम ५४ एफ हे अशा प्रकरणांसाठी लागू होते, जिथे करदाता निवासी घराव्यतिरिक्त इतर दीर्घकालीन भांडवली मालमत्ता विकतो आणि मिळालेली रक्कम नवीन निवासी घर खरेदी किंवा बांधण्यासाठी वापरतो. आवश्यक अटी पूर्ण झाल्यास या कलमान्वयेही करसवलत मिळू शकते.

■ **तीन वर्षांच्या आत नवीन घर**

**विकल्यास काय होते?**

जर करदात्याने कलम ५४ किंवा ५४ एफ अंतर्गत करसवलत घेतल्यानंतर खरेदी केलेले नवीन घर ३ वर्षांच्या आत विकले, तर त्याला पूर्वी मिळालेली करसवलत कायम राहत नाही.

अशा परिस्थितीत नवीन घराची खरेदी किंमत ठरवताना पूर्वी मिळालेल्या करसवलतीची रक्कम त्या किमतीतून वजा केली जाते. त्यामुळे विक्रीवेळी करपात्र भांडवली नफा वाढतो आणि त्यावर अधिक कर भरावा लागू शकतो.



■ **करदात्यांसाठी महत्त्वाचा सल्ला**

कलम ५४ आणि ५४ एफ अंतर्गत मिळणारी करसवलत ही अटींसह दिली जाते. त्यातील सर्वात महत्त्वाची अट म्हणजे नवीन घर किमान ३ वर्षे कायम ठेवणे. हा कालावधी पूर्ण होण्यापूर्वी घर विकल्यास आधी मिळालेली करसवलत रद्द होऊ शकते आणि त्याचा थेट परिणाम करदायित्वावर होतो. त्यामुळे ३१ जुलै २०२६ पूर्वी आयकर विवरणपत्र दाखल करताना अशा सर्व व्यवहारांची योग्य नोंद करणे, कराची अचूक गणना करणे आणि आवश्यक असल्यास करसल्लागाराचा सल्ला घेणे हितावह ठरेल.

◆◆◆

**चुकीचा आयटीआर भरल्यास काय परिणाम होऊ शकतात?**

- जर करदात्याने ३ वर्षांच्या आत नवीन घर विकूनही त्याचा योग्य करपरिणाम आयकर विवरणपत्रात दाखवला नाही, तर आयकर विभागाकडून खालील कारवाई होऊ शकते.
- प्रकरणाची छाननी
- अतिरिक्त कराची मागणी
- करावरील व्याज
- लागू असल्यास दंड
- नोटीस जारी होण्याची शक्यता
- म्हणूनच करसवलतीचा लाभ घेतल्यानंतर नवीन घर विक्रीसंदर्भातील व्यवहार आयटीआरमध्ये अचूकपणे नमूद करणे आवश्यक आहे.

**काय तपासावे?**

- पूर्वी कलम ५४ किंवा ५४ एफ अंतर्गत करसवलत घेतली होती का?
- त्या सवलतीनंतर खरेदी केलेले नवीन घर ३ वर्षांच्या आत विकले आहे का?
- विक्रीमुळे करसवलत मागे घेण्याची वेळ आली आहे का?
- सुधारित भांडवली नफ्याची योग्य गणना केली आहे का?
- आयटीआरमध्ये सर्व माहिती अचूकपणे नमूद केली आहे का?




## आयटीआर भरणा करताना अधिक तपशील द्यावा लागणार

आर्थिक वर्ष २०२५-२६ (मूल्यांकन वर्ष २०२६-२७) साठीच्या नव्या आयकर विवरणपत्र (आयटीआर) फॉर्म्समध्ये विभागाने विविध सवलती आणि वजावटींच्या दाव्यांसाठी अधिक तपशीलवार माहिती मागितली आहे.

■ **ही अतिरिक्त माहिती का महत्त्वाची आहे?**

कर कायद्यातील बदलांनुसार, विभागाला सवलती आणि वजावटींच्या दाव्यांची पडताळणी अधिक सोप्या व पारदर्शक पद्धतीने करता यावी, यासाठी ही माहिती मागवली जात आहे. तज्ज्ञांच्या मते, यामुळे आकडेवारीच्या आधारे पडताळणी शक्य होऊन खोटे किंवा फुगवलेले दावे रोखता येतील.

■ **पडताळणी कशी होणार?**

व्यवहाराचा संदर्भ क्रमांक आणि आयएफएससी कोड दिल्यास, विभाग नियोक्ता, बँका, विमा कंपन्या आणि इतर संस्थांकडून मिळालेल्या माहितीशी दाव्यांची पडताळणी करू शकेल. यामुळे खोटे दावे लवकर ओळखले जातील, तर अचूक माहिती दिल्यास रिटर्न प्रोसेसिंग आणि रिफंड जलद होईल.

■ **एचआरए वरील सवलत**

❖ कलम १०(१३)अ अंतर्गत एचआरए सवलतीचा दावा करताना करदात्याला निवासस्थान, मिळालेला एचआरए, भरलेले भाडे आणि पगाराचा तपशील द्यावा लागेल. ❖ एचआरए तपशील फॉर्म १६ आणि भाड्याच्या नोंदींशी जुळायला हवा. ❖ वार्षिक १ लाख रुपयांपेक्षा जास्त भाडे दिल्यास घरमालकाचा पॅन क्रमांक द्यावा लागेल. ❖ स्वतःचा व्यवसाय असल्यास किंवा एचआरए पगाराचा भाग नसल्यास ही सवलत मिळत नाही (अशा वेळी कलम ८० जी जी लागू होऊ शकते). ❖ स्वतःच्याच घरात राहणाऱ्यांना ही सवलत मिळत नाही.

■ **गृहकर्जावरील व्याज सवलत**

❖ कलम २४(ब) अंतर्गत दावा करताना कर्ज बँकेकडून की अन्य स्रोताकडून घेतले, हे नमूद करावे लागेल. ❖ दाव्यातील व्याजाची रक्कम कर्जदात्याच्या व्याज प्रमाणपत्राशी जुळायला हवी. ❖ घर स्वतः वापरात आहे, भाड्याने दिले आहे, की भाड्याने दिले मानले जाते हे स्पष्ट करावे लागेल. ❖विभाग हा दावा कर्जदात्याचे रेकॉर्ड, फॉर्म १६, एआयएस आणि फॉर्म २६एएसशी पडताळतो.

**चुका अशा टाळाव्यात**

चुकीचा पॅन किंवा व्यवहार संदर्भ क्रमांक, दुहेरी दावे आणि प्री-फिल्ड माहितीवर पडताळणीशिवाय विश्वास ठेवणे ह्या सामान्य चुका आहेत. किरकोळ चूक किंवा अपूर्ण माहितीमुळे फॉर्म नाकारला जाऊ शकतो, डिफेक्टिव्ह रिटर्नची नोटीस येऊ शकते किंवा दंडही होऊ शकतो

❖ आवश्यक तपशील: कर्जदात्याचे नाव, कर्ज खाते क्रमांक, मंजुरीची तारीख, रक्कम, थकबाकी आणि दाव्याची रक्कम.

■ **कलम ८०सी अंतर्गत दावे**

**गुंतवणूक किंवा भरणा प्रकारानुसार तपशील द्यावा लागेल:** जीवन विमा ह्र पॉलिसी क्रमांक, पीपीएफ, ईएलएसएस, राष्ट्रीय बचत प्रमाणपत्र ह्र खाते/दस्तऐवज संदर्भ क्रमांक, ट्यूशन फी व गृहकर्ज मुद्दल परतफेड ह्र संबंधित कागदपत्रे.

**कलम ८० डी अंतर्गत दावे**

आरोग्य विमा वजावटीसाठी विमाधारकाचे नाव, विमा कंपनी, पॉलिसी क्रमांक, भरलेला हप्ता, भरण्याची पद्धत आणि पुरावा जपून ठेवावा.

रोख ऐवजी ऑनलाइन/कार्डद्वारे हप्ता भरणे सुरक्षित, स्वतः, जोडीदार, आश्रित मुले किंवा पालकांच्या मेडिक्लेमवर सवलत मिळते (पालकांसाठी वेगळी मर्यादा). नोंदणीकृत विमा कंपनीकडून टॉप-अप/सुपर टॉप-अप विम्यावरही सवलत मिळते.

■ **कलम ८०जी आणि ८० जीजीसी अंतर्गत दावे**

राजकीय पक्ष किंवा इलेक्टोरल ट्रस्टला दिलेल्या देणगीसाठी संस्थेचे नाव व पॅन द्यावा लागतो.

देणगी फक्त बँकेमार्फत द्यावी रोख देणगीवर सवलत नाही.

देणगी घेणारी संस्था कलम ८० जी अंतर्गत नोंदणीकृत आहे का, हे तपासावे.

नव्या फॉर्ममध्ये देणगीदाराचा तपशील, पॅन, पत्ता, भरण्याची पद्धत आणि पावती क्रमांक द्यावा लागतो.

■ **रिटर्न भरण्यापूर्वी आवश्यक कागदपत्रे तयार ठेवा**

फॉर्म १६, फॉर्म २६एएस, एआयएस, टीआयएस, बँक स्टेटमेंट, वजावटीचे पुरावे, कॅपिटल गेन्स स्टेटमेंट, कर्ज प्रमाणपत्र आणि देणगीच्या पावत्या..

◆◆◆

## किमान शिल्लक रकमेचा विळखा

केंद्र सरकारने संसदेत सादर केलेल्या ताज्या अधिकृत आकडेवारीनुसार, देशातील बँकांनी केवळ गेल्या चार आर्थिक वर्षांत किमान शिल्लक न ठेवल्याच्या दंडापोटी ग्राहकांकडून तब्बल २६ हजार १०० कोटींहून अधिक रुपयांची वसुली केली आहे! यामध्ये खासगी बँका आघाडीवर असून, त्यांनी सामान्य ग्राहकांच्या खिशाला मोठा कात्री लावली आहे.

बँका खाते उघडताना अत्यंत गोड बोलून आकर्षक योजनांची माहिती देतात. आमच्याकडे खाते उघडा, झटपट सेवा मिळवा, असे सांगितले जाते. परंतु, खात्याच्या नियमावलीत बारीक अक्षरांमध्ये किमान शिल्लक रकमेची अट घातलेली असते. शहरांनुसार ही मर्यादा पाच हजार रुपयांपासून ते दहा हजार रुपयांपर्यंत किंवा त्याहून अधिक असू शकते.

ही रक्कम रोजच्या रोज खात्यात असणे आवश्यक नाही, तर संपूर्ण महिन्याची 'सरासरी मासिक शिल्लक' काढावी लागते. खात्यातील सरासरी रक्कम ठरलेल्या मर्यादेपेक्षा अगदी थोडी जरी कमी झाली, तर बँक सरळ खात्यातून दंड कापून घेते. जेव्हा ग्राहकाच्या खात्यात आधीच पैसे नसतात, तेव्हा बँक दंड कापून उरलेली शिल्लक आणखीनच खालावते. यामुळे गरीब वर्ग, शेतकरी, कामगार आणि मध्यमवर्गीय नागरिक अधिक अडचणीत येतात.




सार्वजनिक क्षेत्रातील (सरकारी) बहुतांश बँकांनी ग्राहकांच्या वाढत्या रोषामुळे बचत खात्यांवरील हा दंड रद्द केला किंवा शिथिल केला आहे. परंतु, खासगी बँकांचे धोरण अजूनही सामान्यांच्या खिशाला भगदाड पाडणारे आहे.

यातील सर्वांत महत्त्वाची बाब म्हणजे बँकेच्या या नियमाचे गणित सामान्यांना कधीच उलगडत नाही किंवा ते प्रयत्नही करत नाहीत. बँक तुमच्या खात्यावर दंड आकारण्यापूर्वी एक गणित करते, जे तुम्हीही तुमच्या पासबुक किंवा मोबाईल बँकिंग ॲपवरून पडताळू शकता.

महिन्यातील प्रत्येक दिवसाच्या अखेरीस तुमच्या खात्यात किती रक्कम होती, याची नोंद करा (किंवा स्टेटमेंट काढा). संपूर्ण ३० किंवा ३१ दिवसांच्या दैनंदिन शिल्लक रकमेची बेरीज करा. आलेल्या एकूण बेरीजेला महिन्यातील एकूण दिवसांच्या संख्येने (उदा. ३० किंवा ३१) भाग द्या. यानंतर जी रक्कम येईल, ती तुमची त्या महिन्याची सरासरी मासिक शिल्लक असेल. जर ही सरासरी रक्कम बँकेच्या ठरवून दिलेल्या मर्यादेपेक्षा (उदा. ५,००० किंवा १०,००० रुपये) अगदी एक रुपयानेही कमी भरली, तर बँक तुमच्यावर दंड लादण्यासाठी पात्र ठरते.

**काय काळजी घ्याल?**

दर महिन्याला बँक स्टेटमेंट डाऊनलोड करून त्यात नॉन मेंटेनन्स चार्जेस किंवा सर्व्हिस चार्जेस नावाने कोणतीही कपात झाली आहे का, ते तपासा.

महिन्याच्या मधोमध एकदम सगळे पैसे काढून घेऊ नका. जर मोठी रक्कम काढायची असेल, तर हे लक्षात ठेवा की त्यामुळे उर्वरित दिवसांचे गणित बिघडू शकते.

जर बँकेने चुकीच्या पद्धतीने दंड कापला असल्याचे तुमच्या गणितानुसार निदर्शनास आले, तर त्वरित बँकेच्या शाखेत लिखित स्वरूपात अर्ज देऊन दाद मागावी. आरबीआयच्या नियमांनुसार, चुकीचे शुल्क आकारल्यास बँकांना ती रक्कम परतावी करावी लागते.

◆◆◆

# रूपीबाई बोरा न्यू इंग्लिश स्कूलमध्ये डेंग्यूमुक्तीबाबत जनजागृती


रुपीबाई बोरा न्यू इंग्लिश स्कूलमध्ये डेंग्यू आजाराबाबत विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती करण्यात आली. (छाया – लहू दळवी)

नगर – पावसाळा सुरू झाला की साथीच्या आजारांचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात वाढण्याची शक्यता असते. या पार्श्वभूमीवर आयुक्त यशवंत डांगे यांच्या संकल्पनेतून गेल्या तीन वर्षांपासून डेंग्यूमुक्त अहिल्यानगर अभियान राबविण्यात येत आहे. डेंग्यूमुक्त अहिल्यानगर साप्ताहिक उपक्रमाच्या पाचव्या आठवड्यानिमित्त रूपीबाई मोतीलालजी बोरा न्यू इंग्लिश स्कूल येथे डेंग्यू आजाराबाबत जनजागृती करण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांच्या माध्यमातून डेंग्यू आजारापासून बचाव करण्यासाठी घ्यावयाची काळजी तसेच आवश्यक उपाययोजनांबाबत जनजागृती करण्यात आली.

अभियानाच्या माध्यमातून आतापर्यंत साडेपाच हजार घरांना भेटी देण्यात आल्या आहेत. शहरातील विविध भागांमध्ये औषध व धूर फवारणी करण्यात येत असून, घरांमधील पाणीसाठ्यांची तपासणी करून त्यामध्ये आवश्यकतेनुसार अळीनाशक औषध टाकण्याचे काम केले जात आहे. तसेच विद्यार्थ्यांच्या माध्यमातून डेंग्यू आजाराबाबत नागरिकांमध्ये घ्यावयाची काळजी आणि उपाययोजनांबाबत जनजागृती केली जात आहे.

यावेळी आयुक्त यशवंत डांगे म्हणाले, डेंग्यू हा जीवघेणा आजार असून, महापालिकेच्या माध्यमातून नगरकरांच्या आरोग्याची काळजी घेण्याचे काम केले जात आहे. डेंग्यू आजार होऊच नये, यासाठी समाजामध्ये जनजागृती आणि प्रतिबंधात्मक उपाययोजनांची खरी गरज आहे.

महापालिकेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांसह आशा सेविका व आरोग्य सेविकांच्या माध्यमातून नागरिकांची घरोघरी जाऊन तपासणी केली जात आहे. त्याचबरोबर महापालिकेच्या आरोग्य केंद्रांमार्फत मोफत औषधोपचार व रक्त तपासणीची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. विद्यार्थिनींनीदेखील आपल्या घरी तसेच परिसरात स्वच्छता ठेवण्यासाठी पुढाकार घ्यावा. घराच्या परिसरातील पाणीसाठे नष्ट करून कोरडा दिवस पाळावा, असे आवाहनही आयुक्त यशवंत डांगे यांनी केले.

माजी महापौर सुरेखाताई कदम म्हणाल्या की, अहिल्यानगर महानगरपालिकेच्या वतीने सुरू करण्यात आलेले डेंगूमुक्त अहिल्यानगर अभियान कौतुकास्पद आहे. या अभियानाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये मोठ्या प्रमाणात जनजागृती केली जात आहे.

विद्यार्थी हे उद्याच्या भारताचे उज्ज्वल भविष्य आहेत. त्यांच्या माध्यमातून डेंगू आजाराबाबत जनजागृती होणे गरजेचे आहे. हे अभियान केवळ कार्यक्रमांपुरते मर्यादित न राहता नागरिकांमध्ये पोहोचून त्याचे लोकचळवळीत रूपांतर झाले पाहिजे. प्रत्येक नागरिकाने आपल्या घरापासून परिसरात स्वच्छतेची मोहीम हाती घ्यावी, असे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमास आयुक्त यशवंत डांगे, माजी महापौर सुरेखाताई कदम, नगरसेवक दत्तात्रय कावरे, नगरसेविका मंगलताई लोखंडे, प्राचार्य रवी किरण भांड, उपप्राचार्य विष्णू गिरी, पर्यवेक्षक अरविंद आचार्य, प्रभाग अधिकारी राकेश कोतकर, डॉ. सिमरन वधुवा, डॉ. सृष्टी बनसोडे, डॉ. स्मिता म्हस्के, डॉ. अमोल जाधव, प्रवीण साबळे, सुरेंद्र चोपडा, केशव देशपांडे, किशोर महानूर, वर्षा कुलकर्णी, हिवताप कार्यालयातील कर्मचारी गोरक्ष कर्डिले, गणेश पालवे, विजय नेटके, राजेंद्र गणबोटे, दत्ता सातपुते उपस्थित होते.

प्रास्ताविक डॉ. सृष्टी बनसोडे यांनी केले. सूत्रसंचालन किशोर महानूर यांनी केले. आभार वर्षा कुलकर्णी यांनी मानले.



## गुरुवाणी – ३५
### श्वासोच्छ्वासाचे अद्भुत प्रयोग

तीर्थंकरांनी सांगितलेले ९ तत्वांचे विज्ञान समजून घेतले तर जीवन सुकर होते. हे ९ तत्व कायम चालू असतातच. श्वासोच्छ्वासातूनही आश्रव सुरू असतो. यातून नकळत जितका आश्रव होतो, तो अधिक खोल असतो. सगळ्या आश्रवांचा मूळ आधार श्वासोच्छ्वास आहे. त्यावर कंट्रोल हवा. साधना श्वासापासून सुरू होते. जो श्वासाला समजून घेतो, त्याच्या आयुष्यात 'विश्वास' येतो. कोणत्या वेळी श्वास कसा घ्यावा ? कसा सोडावा ? ही सुद्धा एक कला आहे. एकदा भारतात १२ वर्षे भीषण दुष्काळ पडला. दुष्काळानंतर लक्षात आले की जिन शासनचा मोठा ज्ञानी कोणी राहीला नाही. एकमेव आचार्य भद्रबाहू राहिले होते. ते नेपाळमध्ये श्वासोच्छ्वासाची महाप्राण साधना करत होते. त्यांना संघाने विनंती केली की तुम्ही जिन शासनाच्या ज्ञानदानासाठी यावे. साधना करत असल्याने भद्रबाहुंनी कोणाला तरी ज्ञान ग्रहण करण्यासाठी पाठवण्यास सांगितले. त्यावेळी स्थूलभद्र विद्या ग्रहण करण्यासाठी गेले. त्यांच्या भगिनी ते पाहण्यासाठी गेल्या. तेव्हा स्थूलभद्राने सिंहाचे रुप धारण केले. बहिणी घाबरल्या व आचार्यांकडे गेल्या व सांगितले की, 'तिथं भाऊ नाही सिंह आहे'. आचार्यांना कळलं की, शिष्याने शिकवलेले पचवले नाही. त्याच्यात अहंकाराचा आश्रव आहे. यानंतर आचार्य भद्रबाहूंनी शिष्याला ज्ञान देण्यास नकार दिला. त्याने क्षमा याचना केली. पण आचार्यांनी स्पष्ट नकार दिला. क्षमा केवळ वैरभाव समाप्त करण्यासाठी असते. चुकीसाठी क्षमा नसते तर प्रायश्चित असते. जिन शासनात मैत्री भाव वाढवण्यासाठी क्षमापना ही संकल्पना आहे. चूक झाली तर क्षमा नका मागू. माफी मिळाल्याने चूक सुधारत नाही, चुकीची दुरुस्ती केली तरच त्यात सुधारणा होते. 'जो जिसके योग्य है, वही उसको देना चाहिए'. काही अपराध असे असतात ज्याची शिक्षाच होते. कर्म तुम्हाला भोगण्यास सांगते तर धर्म तुम्हाला जिंकण्यास शिकवतो. धर्म तुमच्या कर्माचा क्षय करतो. आपण औषध रोगमुक्त होण्यासाठी घेतो. तसेच धर्म दुःख मुक्तीसाठी आहे. श्वासाचे प्रयोग तुमच्या जीवनाला नवी दिशा देतील. जीवासाठी आहार, शरीर, इंद्रिये आणि श्वास महत्त्वाचे आहेत. श्वासामुळेच इतर तीन गोष्टी उपयोगी पडतात. श्वासोच्छ्वास मुख्य कंट्रोलर आहे.

**– उपाध्याय प्रवर पू. श्री. प्रविणऋषिजी म. सा.**

# सजग पालकत्वासाठी अर्हम् पेरेंटिंग विशेष कोर्स; उपाध्याय प्रवीणऋषी करणार पालकांना मार्गदर्शन

नगर – आजच्या धकाधकीच्या आणि वेगाने बदलणाऱ्या जीवनशैलीत मुलांचे संगोपन करताना पालकांसमोर येणाऱ्या आव्हानांवर मार्ग काढण्यासाठी अर्हम् पेरेंटिंग या विशेष कोर्सचे आयोजन करण्यात आले आहे. अर्हम् विज्ञा प्रणेता उपाध्याय प्रवीणऋषी यांच्या सान्निध्यात हा उपक्रम पार पडणार आहे.

बदलत्या काळात मुलांमध्ये वाढता स्क्रीन टाइम, छोट्या–छोट्या गोष्टींवर राग येणे, ताण व चिंता, एकाग्रतेची कमतरता, बदलत्या खाण्याच्या सवयी, संवादातील अडचणी आणि हट्टीपणा यांसारख्या समस्या पालकांसमोर येत आहेत. या परिस्थितीकडे केवळ समस्या म्हणून न पाहता, मुलांना अधिक संवेदनशीलपणे समजून घेण्याची संधी म्हणून पाहण्याचा नवा दृष्टिकोन या कोर्सच्या माध्यमातून दिला जाणार आहे. मुलांचे दैनंदिन जीवन, त्यांचे बदलते विचारविश्व आणि भावना समजून घेत पालकत्वाकडे सकारात्मकतेने कसे पाहावे, याबाबत या विशेष सत्रांमध्ये मार्गदर्शन केले जाईल.

हा विशेष कोर्स २ ते ६ सप्टेंबर दरम्यान आयोजित करण्यात आला असून, याची वेळ दररोज रात्री ८:३० ते १०:०० वाजेपर्यंत असणार आहे. आनंदधाम येथे हा कोर्स होणार आहे. मुलांच्या सुंदर भविष्यासाठी आई आणि वडील या दोघांचा सहभाग तितकाच महत्त्वाचा असल्याने, या उपक्रमासाठी आई व वडील दोघांचीही उपस्थिती अनिवार्य करण्यात आली आहे.

सजग आणि समजून घेणारे पालक बनण्यासाठी या कोर्समध्ये सहभागी होऊ इच्छिणाऱ्या पालकांनी अधिक माहितीसाठी ९४२०९५०८७२ किंवा ९४२०६४३८१९ या क्रमांकांवर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# अल्पशा पावसामुळे विहिरी, तलाव कोरडे; जनावरांसाठी चारा, पाणी टंचाईचे सावट


रघुनाथ ठोंबरे

नगर – यंदा पावसाने पाठ फिरवल्याने अहिल्यानगर जिल्ह्यात अनेक भागात चारा पाणी टंचाईचे संकट दिवसेंदिवस गंभीर होत चालले आहे. अत्यल्प पावसामुळे विहिरी, तलाव, बोअरवेल व इतर जलस्रोतांमधील पाणीसाठा कमी झाल्याने शेतीसह पशुधनाच्या चारा पाण्याचा गंभीर प्रश्न शेतकऱ्यांसमोर उभा राहिला आहे. सोयाबीन, तूर यांसारखी पिके पावसाअभावी जळू लागल्याने शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होऊ पाहत असल्याने शेतकरी चिंतातुर झाला आहे.

ही भयावह परिस्थिती पाहता शासनाने तातडीने अहिल्यानगर जिल्ह्यातील दुष्काळ ग्रस्त व पाणीटंचाई ग्रस्त गावांचा आढावा घेऊन गावोगावी जनावरांच्या छावण्या सुरू करण्याची मागणी शेतकरी व सामाजिक कार्यकर्ते रघुनाथ ठोंबरे यांनी केली आहे. सुरुवातीला झालेल्या अल्पशा पावसावर शेतकर्यांनी पेरण्या केल्या, मात्र त्यानंतर पावसाने दीर्घकाळ आजतागायत उघड दिल्याने आवश्यक ओलावा न मिळाल्याने परिणामी अनेक भागात पिकांनी माना टाकल्या आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांपुढे आडात नाही तर पोहर्यात कुठून येईल? या पाणी टंचाई व चारा टंचाईमुळे पशुधन कसे वाचवावे? हा गंभीर प्रश्न शेतकऱ्यांसमोर उभा राहिला आहे.

याचा शासनाने गांभीर्याने विचार करून जनावरांच्या छावण्या सुरू करण्याची मागणी रघुनाथ ठोंबरे, अमोल घिगे, दादासाहेब ठोंबरे, संतोष घिगे, बाळासाहेब ठोंबरे, प्रदीप खरात, मेसू उबाळे या शेतकऱ्यांनी केली आहे.




## गुरुवाणी – ३६
### श्वास हीच मोठी ऊर्जा !

शरीर, इंद्रिये, आहार असूनही श्वासोच्छ्वास नसेल तर काही उपयोग नाही. आईच्या गर्भातच जीवाचा पहिला श्वास सुरू होतो. तेव्हा नाक, फुफ्फुसे तयार सुद्धा झालेली नसतात. हे जैन जीवशास्त्र आहे. 'जैसा श्वासोच्छ्वास वैसा जीवन'. सर्व प्राण शक्तीचे ग्रहण श्वासातूनच होते. तीर्थंकर महावीर दीक्षा घेतल्यानंतर फक्त उभे असायचे किंवा चालायचे. अजिबात बसायचे नाही की झोपण्यासाठी आडवे व्हायचे नाहीत. उभे असतानाही कशाचा आधारही घ्यायचे नाहीत. साडे बारा वर्षे ही तपास्या चालू होती. ही ऊर्जा कुठुन आली? त्याचे उत्तर आहे, 'खोल श्वास'. श्वास जितका खोल असेल तितके मानसिक, शारीरिक आरोग्य चांगले राहते. पोटभर श्वास घेतला तर अतिरिक्त आहार कमी होईल. श्वास छोटा तर ऑक्सिजन सुद्धा कमी मिळतो. परिणामी कार्बन डाय ऑक्साईड बाहेर पडण्याचे प्रमाण कमी असेल. जेव्हा कार्बन डाय ऑक्साईड जास्त बाहेर पडेल तेव्हा शरीरातील टॉक्सिनची जास्त निर्जरा होईल. यासाठी खोल श्वास घेऊन जास्तीत जास्त ऑक्सिजन शरीरात पोहचला पाहिजे. हे जैन तत्वज्ञान समजून घेतले पाहिजे. दहा प्राण जागृत करण्यासाठी, सशक्त करण्यासाठी दीर्घ श्वासोच्छ्वासाची कला महत्वाची असते. ज्याचा 'इगो' दुखावतो, त्याचा इगो मुळातच कमजोर असतो. याचा अर्थ तो 'इगो' पातळ काचेसारखा असतो. जीवाची वाढ गर्भातच जलद होते. कारण गर्भामध्ये जीव श्वास, आहार जितका घेतो ते संपूर्ण १०० टक्के घेतो. तो जीव आईचे डोळे जे पाहतात ते पाहतो, आईचे कान जे ऐकतात ते ऐकतो. आणि या सर्व गोष्टी त्याच्या कायमच्या आठवणीत राहतात. 'अर्हम बेबी'च्या आई वडीलांना याचा अनुभव येत असतो. नवकार महामंत्र म्हणताना खोल श्वास घेतला तर पुण्याचा आश्रव होईल. आपल्याकडे अडीच कोटी नवकार महामंत्र जाप झाला तेंव्हा विविध प्रकारांनी मंत्र म्हटला. यातून श्वास अधिकाधिक खोल करण्यावर भर दिला. एका मिनिटात १२ किंवा १३ वेळा श्वासोच्छ्वास केला पाहिजे. श्वास जेवढ्या वेळेत घ्याल त्याच्या चौपट वेळ श्वास सोडतानाचा असला पाहिजे. नियमित सरावाने ही गोष्ट आत्मसात करणे शक्य आहे. नवकार मंत्र म्हणताना दीर्घ श्वासोच्छ्वासाचा प्रयोग सुरू करा.

**– उपाध्याय प्रवर पू. श्री. प्रविणऋषिजी म. सा.**

# अहिल्यानगरची बॅडमिंटनपटू विधी सैनी देशामध्ये अव्वल

**राष्ट्रीय व राज्य स्पर्धांमध्ये सुवर्णपदकांची लयलूट**



नगर – अहिल्यानगरच्या मॅक्सिमस स्पोर्ट्स अॅकॅडमीमध्ये २०१८ पासून बॅडमिंटनचे धडे गिरवणाऱ्या १४ वर्षीय विधी सैनी हिने आपल्या अष्टपैलू खेळाच्या जोरावर क्रीडा जगतात नवा इतिहास रचला आहे. विधीने नुकतीच भारतीय बॅडमिंटन संघात १५ वर्षांखालील मुलींच्या दुहेरी गटात देशात प्रथम क्रमांक पटकावून अहिल्यानगरच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. तिच्या या दैदिप्यमान कामगिरीमुळे संपूर्ण जिल्ह्यातून तिच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

विधी सैनी ही ऑल इंडिया रँकिंगमध्ये १५ वर्षांखालील मुलींच्या दुहेरी गटात सध्या प्रथम क्रमांकावर विराजमान आहे. अहिल्यानगरमध्ये २०२५ मध्ये झालेल्या राज्य अजिंक्यपद स्पर्धेत घरच्या मैदानावर तिने अप्रतिम खेळ करत सुवर्णपदकावर नाव कोरले होते. छत्रपती संभाजीनगरमध्ये याच वर्षी झालेल्या राज्य निवड चाचणी स्पर्धेत तिने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत सुवर्णपदक पटकावले. २०२४ मध्ये दिल्लीत झालेल्या राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत तिने राज्याचे प्रतिनिधित्व करत सुवर्णपदक मिळवले होते. मध्यप्रदेशात २०२५ मध्ये झालेल्या शालेय राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धेत तिने सलग दुसऱ्या वर्षी सुवर्णपदक जिंकून आपले वर्चस्व सिद्ध केले. यंदाच्या वर्षी हैदराबाद, बंगळुरू व जयपूरमध्ये झालेल्या सलग राष्ट्रीय रँकिंग स्पर्धांत कांस्यपदक मिळवून आपली सातत्यपूर्ण कामगिरी कायम ठेवली.

मॅक्सिमस स्पोर्टस् अॅकॅडमीमध्ये गेल्या ८ वर्षांपासून घेतलेले कठोर प्रशिक्षण आणि प्रशिक्षक रोहित शर्मा यांचे योग्य मार्गदर्शन यामुळेच विधीने हे यश संपादन केले आहे. शिस्तबद्ध सराव, सातत्यपूर्ण प्रशिक्षण आणि स्पर्धात्मक वातावरणामुळे विधीने आपल्या खेळात सातत्याने प्रगती साधली आहे. अत्यंत कमी वयात विधीने राष्ट्रीय पातळीवर मिळवलेले हे यश आगामी काळातील तिच्या आंतरराष्ट्रीय वाटचालीचे संकेत देत आहे. विधीची ही कामगिरी अहिल्यानगरच्या युवा बॅडमिंटनपटूंना निश्चितच प्रेरणादायी ठरणार आहे.

# १०० वे साहित्य संमेलन मराठी भाषेच्या समृद्ध प्रवासाचा सुवर्णक्षण असेल

**योगेश सोमण यांचे प्रतिपादन; अहिल्यानगर जिल्ह्यात साहित्यिकांचा स्नेहमेळावा संपन्न**


१०० व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या पार्श्वभूमीवर नगरमध्ये साहित्यिकांच्या मेळाव्यासाठी आलेले मसापचे अध्यक्ष योगेश सोमण यांचा सत्कार करताना नरेंद्र फिरोदिया, जयंत येलूलकर आदी.

नगर – १०० वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन पुणे येथे संपन्न होते आहे. त्या निमित्ताने या संमेलनाचे निमंत्रण देण्यासाठी संपूर्ण भारतभर व विदेशात एकूण ९९ नांदी संमेलन संपन्न होत आहेत. ही नांदी संमेलन म्हणजे नव्या पर्वाचा आरंभ आहे. मराठी रसिक वाचक लेखक साहित्यिक आणि सर्वांनाच त्या त्या शहरात त्या त्या भागात राहणाऱ्या नागरिकांना शंभराव्या संमेलनाचे हे निमंत्रण आहे. असे प्रतिपादन महाराष्ट्र साहित्य परिषदेचे अध्यक्ष योगेश सोमण यांनी नगर येथे आयोजित स्नेह मेळाव्यात आपली संमेलनाची भूमिका स्पष्ट केली .

अहिल्यानगर जिल्ह्याचा स्नेह मेळावा नुकताच संपन्न झाला. यावेळी नगर जिल्ह्यातील सर्व महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या शाखांचे प्रमुख पदाधिकारी लेखक साहित्यिक वाचक उपस्थित होते. या सर्वांना त्यावेळी त्यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सावेडी उपनगर शाखेचे अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया हे होते. या स्नेह मेळाव्याला मार्गदर्शन करण्यासाठी अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे अध्यक्ष व महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे यांचे अध्यक्ष योगेश सोमण, कोषाध्यक्ष गजलकार प्रदीप निफाडकर, विभागीय कार्यवाह जयंत येलुलकर, जिल्हा प्रमुख प्रा गणेश भगत, व समन्वयक निखिल पाटील आदी उपस्थित होते.

यावेळी विचारपीठावरील मान्यवरांचा विभागीय कार्यवाह जयंत येलुलकर व जिल्हाप्रमुख प्रा गणेश भगत यांनी यथोचित सत्कार सन्मान केला. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया यांचा त्यांच्या योगदानाबद्दल नगर जिल्ह्यातील सर्व साहित्यिक लेखक व शाखांच्या वतीने मान्यवरांच्या शुभहस्ते सन्मान करण्यात आला.

यावेळी ९९ नांदी संमेलनांपैकी सहा नांदी संमेलन अहिल्यानगर जिल्ह्यातील विविध तालुक्यात संपन्न होणार आहेत व त्याची भूमिका त्याच स्वरूप याविषयी आपल्या मनोगतातून समन्वयक निखिल पाटील यांनी माहिती दिली.

प्रदीप निफाडकर यांनी यावेळी बोलताना सांगितले की माझा नगरची अतिशय जुना स्नेह संबंध आहे त्यामुळे नगरमध्ये अतिशय प्रभावीपणे आपण हे संमेलन पार पाडावीत जेणेकरून नगर शहरातून मोठ्या संख्येने नागरिकांनी या संमेलनात हजेरी लावून शंभराव्या संमेलनाची साक्षीदार व्हावेत अशा प्रकारची भूमिका विचार मांडले व नांदी संमेलनासाठी शुभेच्छा दिल्या.

यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया यांनी अध्यक्ष मनोगत व्यक्त करताना सांगितले की नगर शाखा व उपनगर शाखा असा आमच्या मध्ये भेद नसून नगर शहरात या दोन्ही मिळून एकच शाखा आहे असे आम्ही म्हणतो. तसेच अहिल्या नगर जिल्ह्यामध्ये जी संमेलन होणार आहेत ती अतिशय सुंदर आणि उत्कृष्ट होतील. विभागीय कार्यवाह जयंत येलुलकर यांनी अहिल्यानगर जिल्ह्याला मोठा साहित्य वारसा आहे.१९९७ मध्ये येथे संपन्न झालेले अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन हे साहित्य विश्वाला दिशा देणारे ठरले होते.अहिल्यानगर जिल्ह्यातील संमेलन उत्तम आयोजन, साहित्यिकांच्या, रसिकांच्या सहभागाने यशस्वी होईल यासाठी सर्वजण परिश्रम घेतील व अतिशय उत्कृष्टपणे अहिल्यानगर जिल्ह्याचे कार्य असेल असे सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रंचलन जिल्हाप्रमुख प्रा. गणेश भगत यांनी केले.



वांबोरी येथील महेश मनोत विद्यालयात कै. वसंतलाल मुथा यांच्या स्मृतिदिनानिमित्त अभिवादन करताना मीनाताई मुनोत व इतर.

# मोबाईलमध्ये न गुंतता मैदानी खेळांना महत्त्व द्या

**मीनाताई मुनोत यांचे प्रतिपादन; महेश मुनोत विद्यालयात गुणवंतांना पारितोषिकांचे केले वितरण**

नगर – विद्यार्थ्यांनी मोबाईलमध्ये अधिक वेळ न गुंतता मैदानी खेळ व शारीरिक श्रमांना महत्त्व द्यावे. महिलांनी स्वतःला कधीही कमजोर समजू नये. मुले व मुली हे समाजरूपी रथाची दोन चाके असून, विद्यार्थ्यांनी योग्य ध्येय निश्चित करून ते साध्य करण्यासाठी सातत्याने प्रयत्न करावेत, असे आवाहन नगर मर्चंट्स बँकेच्या माजी चेअरमन तथा संचालिका मीनाताई मुनोत यांनी केले.

वांबोरी येथील अ. ए. सोसायटीच्या महेश मुनोत माध्यमिक विद्यालयात विद्यालयाचे माजी चेअरमन कै. वसंतलाल मुथा यांच्या स्मृतिदिनानिमित्त प्रतिमापूजन, अभिवादन व गुणवंत विद्यार्थ्यांचा पारितोषिक वितरण समारंभात त्या बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. विठ्ठलदास झंवर होते. आनंदऋषीजी म.सा. जयंतीनिमित्त आयोजित निबंध स्पर्धेत सहभागी झालेल्या १०० विद्यार्थिनींचाही यावेळी गौरव करण्यात आला.

राहुरी वकील संघाचे अध्यक्ष अॅड. ऋषिकेश मोरे यांनी कै. वसंतलालजी मुथा हे उत्कृष्ट विधिज्ञ, शिस्तप्रिय व कर्तृत्ववान व्यक्तिमत्त्व होते, असे सांगून विद्यार्थ्यांनी त्यांच्या जीवनातील चांगले गुण आत्मसात करावेत, असे आवाहन केले.

कार्यक्रमास हेमंत मुथा, बबलुशेठ मुथा, अॅड. तात्यासाहेब डोळसे, अॅड. ऋषिकेश मोरे, प्राचार्या शुभांगी देशपांडे, उपप्राचार्या वनिता बोऱ्हाडे, पर्यवेक्षक सुधाकर वाबळे, अ. ए. सोसायटी प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका मीना पवार यांच्यासह शिक्षकवृंद उपस्थित होते. प्रास्ताविक राम पालवे यांनी केले. मान्यवरांचा परिचय हर्षल कुलकर्णी यांनी करून दिला. कै. वसंतलालजी मुथा यांच्या जीवनकार्याचा परिचय बाळासाहेब नवले यांनी करून दिला. सूत्रसंचालन अनिकेत पाठक यांनी केले. आभार संभाजी पवार यांनी मानले.

# श्रमिक बालाजी मंदिरात शनिवारच्या महाप्रसाद उपक्रमाची द्विवर्षपूर्ती साजरी


श्रमिक बालाजी सेवा संस्थेच्या वतीने आयोजित शनिवार महाप्रसाद उपक्रमाच्या द्वितीय वर्धापनदिनानिमित्त भाविकांसह वंचित घटकांना अन्नदान करण्यात आले.

नगर – शहरातील लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या श्री श्रमिक बालाजी मंदिरात दर महिन्याच्या शेवटच्या शनिवारी श्री श्रमिक बालाजी सेवा संस्थेच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन केले जात आहे. याचा लाभ हजारो भाविक घेत असतात. या महाप्रसाद उपक्रमाची द्विवर्षपूर्ती उत्साहात साजरी करण्यात आली. यानिमित्ताने श्री बलाजींची महाआरती करून भाविकांसह तपोवन रोडवरील बालगृह प्रकल्पातील वंचित मुलांना नगरसेवक करण कराळे, पुष्कर कुलकर्णी यांच्या हस्ते महाप्रदाचे वाटप झाले.

यावेळी श्री श्रमिक बालाजी सेवा संस्थेचे अध्यक्ष राजेश पासकंटी, सेक्रेटरी नगरसेवक मनोज दुलम, उपाध्यक्ष गणेश रच्चा, खजिनदार अमृत सद्रे, विश्वस्त गणेश येमुल, राजेश्वर श्रीराम, भास्कर अलचेट्टी, विनीत बुरला, सुनील कोडम व अमित दिकोंडा यांच्यासह विविध क्षेत्रातील नागरिक भाविक उपस्थित होते.

प्रास्ताविकात नगरसेवक मनोज दुलम म्हणाले, श्री श्रमिक बालाजी मंदिरात महाप्रसादाचा उपक्रम सुरु करण्याची संकल्पना दोन वर्षांपूर्वी सुचली. त्यानुसार प्रत्येक महिन्याच्या शेवटच्या शनिवारी हा उपक्रम सुरु आहे. यासाठी श्री श्रमिक बालाजी सेवा संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी केवळ १०० रुपयांच्या स्व मदतीने सुरवात केली. आता त्यास भव्य स्वरूप आले असून अनेक दानशूर व्यक्ती आमच्या मागे उभ्या आहेत. या उपक्रमाच्या द्वितीय वर्धापनदिनाच्या आनंद सोहळ्यात वंचित घटकांना सामावून घेत त्यांच्या चेहऱ्यावर समाधान फुलवले आहे.

सूत्रसंचालन लक्ष्मिकांत नल्ला महाराज यांनी केले. महाप्रसादासाठी सहकार्य करणारे जितेंद्र जाधव, किरण शिंदे यांच्यासह श्रमिक बालाजी सोसायटीचे अध्यक्ष विलास सगम, मार्कंडेय पतसंस्थेचे चेअरमन नानासाहेब कोडम व राष्ट्रीय फुटबॉल खेळाडू तनिशा शिरसूल यांचा सत्कार करून त्यांचे आभार मानले.

या कार्यक्रमास सल्लागार किरण शिंदे, अशोक कोंडा, सागर देवसानी, कृष्णहरी यंगल, शेखर नागवेल्ली, महिला सल्लागार गीता बंडी, ज्योती यमजाल, रेणुका शेराल, विद्या एक्कलदेवी व रेखा दुलम उपस्थित होते.

